







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १९.०८.२०२५ | अंक नं. ११९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# आत्महत्येची वेळ आल्याने कंत्राटदारांची थकीत देयके तातडीने द्या अन्यथा सर्व ठेकेदार रस्त्यावर उतरून 'सरकारचा निषेध' करणार

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून विविध संघटनांनी दिला इशारा

नगर – राज्य शासनाच्या विविध योजनेअंतर्गत कंत्राटदारांनी विकासाची कामे पूर्ण केली असून आत्तापर्यंत जवळपास ९० हजार कोटीची बिले शासनाकडे प्रलंबित आहे, आम्ही विविध संघटनांमार्फत प्रशासनाकडे पाठपुरावा आंदोलने केली, निवेदने देखील दिली परंतु सरकारकडून आमच्या निधीबाबत कुठलाही ठोस निर्णय अद्यापपर्यंत झाला नसल्यामुळे ठेकेदार अक्षरश: कर्जबाजारी झाले असून त्यांना विविध कर्जाच्या हप्ते भरणे देखील शक्य होत नाही. आता कंत्राटदारांवर उपासमारीची वेळ आली असून त्यांच्यावर अवलंबून असणारे कामगार, वाहन चालक, इंजिनियर, सुपरवायझर यांना देखील वेळेवर पगार होत नाही, यामुळेच राज्यात ठेकेदारांच्या आत्महत्येसारखे प्रमाण वाढत आहे. तरी ८ दिवसांमध्ये सरकारने कंत्राटदारांचे थकीत देयके तातडीने द्यावेत अन्यथा ठेकेदारांना रस्त्यावर उतरून सरकारचा निषेध करावा लागेल. संपूर्ण राज्यातील कंत्राटदार इंजिनीयर मिलिंद भोसले यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करत आहे. वेळ पडल्यास मुंबईतील आझाद मैदानावर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला.

यावेळी संजय गुंदेचा, बाळासाहेब मुरदरे, राहुल शिंदे, विष्णू तवले, शिवाजी येवले, दीपक दरे, मिलिंद वायकर, उदय मुंडे, इंजिनीयर समीर शेख, हर्षद भोर्डे, मिलिंद बोगाणे, राजेश देशमुख, विलास जगताप, अनिल कोठारी, गोरख झिने, अक्षय कराड आदींसह जिल्ह्यातील विविध संघटनेचे कंत्राटदार उपस्थित होते

महाराष्ट्रातील जवळपास सार्वजनिक बांधकाम विभाग, जलजीवन मिशन ग्रामीण पाणीपुरवठा ग्रामविकास विभाग, जलसंपदा जलसंधारणसह अनेक विभागातील शासनाची विकासाची कामे कंत्राटदारांनी पूर्ण केली असून गेल्या ८ महिन्यांपासून एक रुपयाही शासनाकडून मिळाला नाही राज्यातील अभियंता, ओपन कंत्राटदार, मजूर संस्था वाहतूकदार माल सप्लायर्स, हातावर पोट असणारे रोजंदारी कामगार, कायम नोकरीस असणारा शिक्षित वर्ग, यासारखे पाच ते सहा कोटी समाजातील घटकांचा रोजगार व व्यवसाय अक्षरश: देशोधडीला लागला आहे. या सर्व उपेक्षितांच्या वरील सर्वच प्रश्न समस्या, अडचणींबाबत तातडीने शासनाने मार्ग काढणे गरजेचे आहे. १९ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्वच ३५ जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कंत्राटदार यांचे धरणे आंदोलन झाले आहे. राज्यातील सगळी विकास कामे ठप्प आहे कुठल्याही शासकीय लेखाशीर्षकावर कंत्राटदार यांचे देयके देण्यासाठी निधी उपलब्ध केला जात नाही, नवीन कोणतेही सरकारी विभागाकडे विकासात्मक कामे मंजूर केली जात नाही, शासनाने देखील लाडका ठेकेदार म्हणून केलेल्या कामांची देयके तातडीने द्यावी, अशी मागणी बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ यांच्यावतीने केली. *(छायाचित्र पान २ वर)*

# आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी महापालिकेत काळ्या फिती लावून केले 'आंदोलन'

## १ सप्टेंबरपासून आरोग्य विभागातील एनयू एच एम व एल टी ई पी कर्मचाऱ्यांचा धरणे आंदोलन करणार



मनपाच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी मागण्यांसाठी काळ्या फिती लावून आंदोलन केले. (छाया – लहू दळवी)

नगर – राज्यभरातील आरोग्य विभागातील एन. यू. एच. एम व एल. टी. ई. पी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत करावे या मागणीसाठी राज्यभर काळ्याफिती लावून आंदोलन करण्यात आले आहे. अहिल्यानगर पालिकेतील ५९ कर्मचारी सहभागी झाले असून मनपा कर्मचारी युनियनच्या वतीने पाठिंबा जाहीर केला आहे. १० वर्ष पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून याचा जीआर देखील काढला आहे, परंतु महापालिकेकडून कुठलीही अंमलबजावणी झालेली नाही, १ सप्टेंबर पर्यंत महापालिकेने शासनाकडे सर्व त्रुटी दूर करून आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव पाठवावा अन्यथा धरणे आंदोलन सुरु केले जाईल यामध्ये महापालिकेच्या सर्व विभागातील कर्मचारी पाठिंबा म्हणून सहभागी होतील अशी माहिती मनपा कर्मचारी युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सचिव आनंद वायकर यांनी दिली आहे. यावेळी नंदकिशोर नेमाने, डॉ. दिलीप बागल, योगेश औटी व कर्मचारी उपस्थित होते

महापालिका आरोग्य विभागामध्ये एन. यु. एच. एम व एल. टी. ई. पी चे कर्मचारी अनेक वर्षांपासून नगरकरांना आरोग्याच्या सुविधा देत आहे, कोरोनाच्या संकट काळामध्ये देखील या कर्मचाऱ्यांनी आपला जीव धोक्यात घालून नगरकरांचे आरोग्य जपण्याचे काम केले आहे. १० ते १५ वर्षे या कर्मचाऱ्यांनी आपली सेवा केली आहे. तरी देखील त्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी अहिल्यानगर मनपा कर्मचारी युनियन या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी आहे, आपला प्रश्न मार्गी लागण्यासाठी कर्मचाऱ्यांनी देखील एक संघ रहावे, आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडे पाठपुरावा करू व हा प्रश्न मार्गी लावून घेऊ, मनपा कर्मचारी युनियनने आतापर्यंत पाठपुराव्यातूनच कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत, अशी भावना बाबासाहेब मुदगल यांनी व्यक्त केली.












शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखले जाणारे श्री विशाल गणेश यांची हुबेहूब उत्सव मूर्ती या वर्षी प्रथमच गणेशोत्सवात भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. या गणेश मुर्तीवर अखेरचा हात मारताना केडगांव देवी रोड येथील मुर्तीकार अक्षय लाटणे व सौ.सोनाली लाटणे.

# ग्रामदैवत श्री विशाल गणेशाची उत्सव मूर्ती प्रथमच उपलब्ध

नगर – शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखले जाणारे श्री विशाल गणेश यांची हुबेहूब उत्सव मूर्ती या वर्षी प्रथमच गणेशोत्सवात भाविकांच्या घराघरात विराजमान होणार आहे. श्री विशाल गणेश देवस्थान समितीची अनेक वर्षांपासून असलेली इच्छा अखेर पूर्ण झाली आहे. नगर शहरातील गणेश मूर्तिकार अक्षय लाटणे यांनी परिश्रमांनंतर ही प्रतिकृती साकारण्यात यश मिळवले आहे. या मूर्तीची उंची पावणेदोन फूट असून ती मूळ मूर्तीप्रमाणेच आकर्षक व जीवंत भासते. आतापर्यंत अनेकांनी प्रयत्न करूनही अशी मूर्ती तयार करण्यात अपयश आले होते; मात्र मूर्तिकार लाटणे यांनी अखेर हे स्वप्न सत्यात उतरवले आहे.

मूळ विशाल गणेशाची मूर्ती ही उजव्या सोंडेची आहे. परंतु उत्सवात घराघरात विराजमान करताना पारंपरिक अडचणी येऊ नयेत म्हणून ही उत्सव मूर्ती डाव्या सोंडेची बनविण्यात आली आहे. त्यामुळे गणेश भक्त घरामध्ये सहजतेने या मूर्तीची स्थापना करू शकतात, असे देवस्थान समितीचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी स्पष्ट केले.

मूर्तीविषयी अधिक माहिती देताना आगरकर म्हणाले, भाविकांना ही मूर्ती उपलब्ध करून देण्यात येत आहे. यावर्षी मात्र मर्यादित संख्येतच मूर्ती उपलब्ध असल्याने नोंदणीकृत भाविकांनाच ही मूर्ती देण्यात येणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी ९६२३६७८५८७ संपर्क साधावा.

या मूर्तीचे विशेष म्हणजे अहिल्यानगरपुरतेच मर्यादित न राहता या उत्सव मूर्ती आता परराज्यातही पोहोचत आहेत. काही मूर्ती हैदराबाद, आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि गोवा या राज्यांमध्ये भाविकांनी मागविल्या आहेत. यामुळे प्रथमच अहिल्यानगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश घराघरात तसेच इतर राज्यांमध्येही विराजमान होत असल्याचा अभिमान नगरकरांना वाटत आहे.

मूर्तिकार अक्षय लाटणे म्हणाले, श्री विशाल गणेशाची हुबेहूब मूर्ती तयार करण्याचा प्रयत्न मागील अनेक वर्षांपासून सुरू होता. परंतु वारंवार अडथळे येत होते. या वर्षी मात्र अथक परिश्रमानंतर आम्ही यशस्वी झालो. ही माझ्यासाठी आणि नगरकरांसाठी एक मोठी अभिमानाची गोष्ट आहे.




# गृहिणी

## आरोग्य

एक ग्लास लिंबूपाणी उन्हापासून आराम देण्याचे काम करते. रोज सकाळी कोमट लिंबू पाणी प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत होते. लिंबू कोणत्याही पदार्थाची चव त्याच्या आंबटपणाने वाढवते. लिंबू केवळ जेवणाची चवच वाढवत नाही तर, आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. यात अनेक प्रकारच्या जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. हे फळ तुम्हाला कोणत्याही ऋतूत मिळेल. लिंबू हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. सकाळी रिकाम्या पोटी लिंबू पाणी प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. आयुर्वेदातही लिंबू खूप फायदेशीर मानले जाते.

## पाककला

### फुलांचे चिरोटे

**साहित्य** : बारीक रवा एक वाटी, तूप पाव वाटी, चिमूटभर मीठ, दूध गरजेनुसार, गुलाबी रंग चिमूटभर, हिरवा रंग चिमूटभर, तळण्यासाठी तूप.

**कृती** : रव्याला वनस्पती तूप चोळून घ्या. मीठ घाला. मिश्रणाचे दोन भाग करा. एका भागात गुलाबी रंग घालून दुधाने मळून घ्या. दुसऱ्या भागात हिरवा रंग घालून दुधाने मळून घ्या. हे पीठ दोन तास ओल्या कपड्याखाली ठेवा. नंतर वेगवेगळे कुटून घ्या. गुलाबी रंगाचे दोन गोळे करा. एक पातळ लाटून घ्या. त्यावर साटा पसरवून त्याच्या एक इंचाच्या पट्ट्या कापून घ्या. हिरव्या रंगाचा एक गोळा घेऊन पातळ लाटून घ्या. त्यावर साटा लावा, पट्ट्या कापून घ्या. पहिल्यांदा गुलाबी रंगाचा रोल करा. त्यावर हिरवी पट्टी गुंडाळून घ्या. मधे दाबून हलक्या हातांनी थोडेसे लाटा व तुपात तळून घ्या. छान फुलाचा आकार येईल. त्यावर पिठीसाखर घाला.

## सौंदर्य

❋ त्वचा कोरडी झाली असेल तर दोन टेबलस्पून गुलाब पाणी घेऊन त्यात चंदन पावडर टाकून त्याचा लेप चेहऱ्यावर लावावा. अर्ध्या तासानंतर धुवून घ्यावे.

❋ एक चमचा दही घेऊन त्यात एक चमचे उडद डाळीची पावडर घेऊन पेस्ट करावी. चेहऱ्यावर लावावे. सुकल्यावर पाण्याचे सपकारे मारून मग कापसाने खालून वर अशा दिशेने पुसावे. यामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी होतात. त्याचप्रमाणे सकाळी लवकर उठून सुर्याची किरणे अंगावर घ्यावीत आणि कोवळ्या उन्हात सुर्यनमस्कार घालण्याचाही त्वचेसाठी खुप फायदा होतो.

## सल्ला

चांगल्या झोपेसाठी रात्री बेडशीट वर लैवेन्डर किंवा ऑरेंज एसेन्शियल ऑईलचे २-३ थेंब टाकावे.

## वास्तू

बहुतेक घरात तुटलेल्या फुटलेल्या वस्तू एखाद्या कोपऱ्यात किंवा माळ्यावर पडलेल्या असतात. अशा तुटक्या वस्तू घरात ठेवू नये. यामुळे आर्थिक अडचणी वाढतात. या वस्तूंच्या प्रभावामुळे माता लक्ष्मीची कृपा प्राप्त होत नाही.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५

**प्रदोष, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, पुनर्वसु २४।२७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. कामाचा ताण जाणवेल. वाहने व उपकरणे सावकाश हाताळावीत. मात्र बेफिकीर असायला नको.

**वृषभ** : उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. मनोरंजनात वेळ जाईल. अडचणी राहतील. दिवस निरुत्साही वाटेल.

**मिथुन** : खासगी कामाकडे जास्त लक्ष द्या. पैसा मिळेल. जबाबदारीची कामे पडतील. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. दिवस आनंदात जाईल.

**कर्क** : शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मन रमणार नाही. विश्वास कमी राहील. पितृचिंता सतावेल.शत्रुपक्ष डोके वर काढेल.

**सिंह** : मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. मित्रांची साथ लाभेल. नवपरिणीतांसाठी दिवस अत्यंत अनुकूल आहे.

**कन्या** : अडकलेला पैसा मिळेल. गुढ अनुसंधान करणाऱ्यांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास लाभेल. अडकलेला पैसा मिळेल. राहिलेली कामे पूर्ण होतील.

**तूळ** : आपल्या प्रयत्नाने उन्नती कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. मातृचिंता सतावेल. वाहने व मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी लागेल.

**वृश्चिक** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करतानाही यशस्वी व्हाल.

**धनु** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आत्मविश्वास द्विगुणीत होईल.


**मकर** : आपली दूरदृष्टी आणि बुद्धीने अडकलेली कामे पूर्ण होतील. सामाजिक क्षेत्रात घवघवीत यश प्राप्त होईल. मागील केलेली भक्ती आज फळास येईल.

**कुंभ** : आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. कामांची गती मंदावेल. मुलर-मुलींची चिंता सतावेल. हितशत्रू डोके वर काढण्याची शक्यता आहे. कालच्या दिवसाइतका आजचा दिवस चांगला जाणार नाही.

**मीन** : भूमी, घर विकत घेण्याचे योग. आरोग्यात सुधारणा. मानसिक स्थिती उत्तम राहिल. मागील चिंता दूर होतील. मात्र कार्यालयीन सहकार्यांशी सुसंवाद ठेवावे लागतील.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२४५ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२४४ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) समुद्रातील गुळगुळीत दगड, गजगा ५) एक अधिक पाव ७) आवश्यकता; नड; जरुरी ८) आश्चर्य; अचंबा; नवलाईची गोष्ट ९) युवती ११) ऊस, फळ वगैरेतील द्रव १२) हाताच्या किंवा पायाच्या बोटाच्या शेंड्यावरील कवच १५) कापड; वस्त्र; कपडा १७) सटसटीत एकेरी अंगाचा; काटकोळा २०) बुद्धिबळ वगैरे ज्यावर खेळतात ते विशिष्ट आकाराचे वस्त्र २१) एकरूप; तादात्म्य २४) वर्गणी; चंदा २५) जबरदस्ती

**उभे शब्द :-** १) एक इमारतोपयोगी मूल्यवान लाकूड व त्याचे झाड २) फळातील रसाळ भाग; मगज ३) एक धातू; रुपे; चांदी ४) कागद एकमेकांना जोडण्याची नेडे नसलेली सुई ५) आदर, सन्मान; गौरव ६) वडिलोपार्जित संपत्तीवरचा हक्कदार; उत्तराधिकारी १०) लग्नात वधुपक्षाकडून वरपक्षाला देतात त्या विविध भेटवस्तू १३) दटावणी; झाडाझडती १४) माहिती; जाणीव; विषयाचे आकलन १६) झाडाची पाने हलताना होणारा आवाज १८) कालवा; नहर १९) अरबस्तानातील रहिवासी २२) मला २३) धातूची तार; धातूच्या तारेत गुंफलेला राशिना दागीना

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलन :
अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : धाडसी लोकांना नशीब साथ देत असते.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## डॉक्टरांनी किती फी घ्यावी, हे कसे ठरते?

तुम्ही पाहिले असेल की, डॉक्टरांच्या खोलीत ''पहिल्या तपासणीची फी ५० रुपये'', ''पुनर्तपासणी २५ रुपये'' अशा पाट्या लावलेल्या असतात. वेगवेगळ्या शहरात ही फी वेगवेगळी असते. वेगवेगळ्या उपचार पद्धतींच्या बाबतीतही ही फी वेगवेगळी असते. वैद्यकिय सेवा ही अत्यंत कौशल्यपूर्ण अशी तांत्रिक सेवा आहे. डॉक्टरांनी किती फी घ्यावी, याबाबत कोणताही कायदा नाही. एखादा डॉक्टर ५० घेईल, तर दुसरा ५०० घेईल. स्वतःची फी ठरवण्याचा डॉक्टरला कायद्याने अधिकार आहे. डॉक्टरचे स्वतःविषयीचे मूल्यमापन, त्याचा त्या क्षेत्रातील अनुभव, त्याच्या पदव्या, त्याला मिळालेली प्रसिद्धी, त्याच्याकडे असलेली आधुनिक उपकरणे व रुग्णांची आर्थिक परिस्थिती या सर्वांच्या आधारे डॉक्टरांची फी आपोआप ठरत असते. बऱ्याच ठिकाणी वेगवेगळ्या तज्ज्ञांच्या (जसे बालरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ) संघटना अस्तित्वात असतात. त्या डॉक्टर व रुग्ण या दोहोंचे हीत लक्षात घेऊन तपासणी शुल्क ठरवतात. यात रुग्णाला फीबाबत माहिती व्हावी, गैरसमज होऊ नये, तसेच डॉक्टरांचेही नुकसान होऊ नये; हा हेतू असतो. बऱ्याचदा डॉक्टर इतरांपेक्षा कमी फी घेऊन अनैतिक स्पर्धा चालू करतात. त्यालाही यामुळे आळा बसू शकतो. गरज, पुरवठा व बाजारातील परिस्थिती यांवर जसे सर्व वस्तूंचे भाव ठरतात; त्यानुसारच डॉक्टरांची फीही ठरते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## सिंदूक पक्षी

सिंदूक नावाचा पक्षी सहसा कुठे आढळत नाही. दुर्मिळ असल्याने कोणाला तो दिसत नाही आणि त्याच्याबद्दल कोणाला फारसे काही माहीतही नसते.

मात्र या पक्ष्याचा एक गुणधर्म असा की, याच्या पोटात गेलेल्या अन्नाचे रूपांतर सोन्यात होते; म्हणून त्याची विष्ठा हे सोनेच असते.

असाच एक पक्षी एका रानात राहत होता. त्याचे दिवस असे सुखा-समाधानात चालले असता एके दिवशी त्याच्यावर विघ्न चालून आले. त्या रानात एक पारधी आला आणि त्याने एके ठिकाणी आपले जाळे लावून ठेवले; आणि नेमका या जाळ्यात कधीही न अडकणारा तो सिंदूक पक्षी दुर्दैवाने अडकला. बिचारा फारच घाबरला. त्यातच त्याने विष्ठा टाकली. ती सोन्याची होती. पारध्याने ते पाहिले. हा अजब प्रकार पाहून त्याला फारच नवल वाटले. लहान असल्यापासून तो पक्षी पकडत होता; पण असे कधी घडले नव्हते. आपल्या ऐंशी वर्षांच्या आयुष्यात त्याने प्रथमच हे आश्चर्य अनुभवले होते. असा पक्षी त्याला कधीच सापडला नव्हता.

पारध्याला आनंद झाला. त्याने जाळ्यातून पक्ष्याला बाहेर काढून पिंजऱ्यात ठेवले. पिंजरा घेऊन घरी आला. पण त्याचा आनंद फार काळ टिकला नाही. या अद्‌भुत पक्ष्याबद्दल सर्वांना समजणार होते. उद्या राजाच्या कानांवर ही गोष्ट जाताच राजा तो पक्षी तर घेऊन जाईलच; पण शिक्षा म्हणून जबर दंड केल्याशिवाय सोडणार नाही, असे विचार मनात येताच पारधी मनोमन घाबरला.

राजकोप झाला, तर आपले हाल कुत्र्यासारखे होतील, असे वाटताच पारध्याने घराची वाट सोडली व तो राजवाड्याकडे निघाला व सरळ राजवाड्यात गेला. दरबारात राजा होता. दरबारी मंडळी होती. पारधी तेथेच गेला. त्याने राजाला या अद्‌भुत पक्ष्याबद्दल सांगताच राजाही फार आश्चर्यचकित झाला. आनंदानेच त्याने सेवकांना आज्ञा केली.

''याला घेऊन जा. याची चांगली देखभाल करा.चांगले खाणे-पिणे द्या.' याच सभेत राजाचा प्रधानही होती. त्याने हे पाहिले, ऐकले. तो राजाला म्हणाला,

''अहो महाराज, या थापाड्या पारध्यावर काय विश्वास ठेवता ? वाटेल तो बकतो आहे. याच्या सांगण्याला फसू नये. हा काहीही सांगेल. विष्ठी कधी सोन्याची असते काय ? म्हणून या पारध्याला हाकलून लावा आणि बिचाऱ्या त्या गरीब पक्ष्याला सोडून द्या.''

प्रधानाचे म्हणणे राजाला पटले. उगीच कोणावर विश्वास ठेवून आपले हसू होऊ नये; म्हणून त्याने पिंजऱ्याचे दार उघडून पक्ष्याला सोडून पारध्याला लावले हाकलून. घाबरलेला पक्षी जो उडाला, तो राजसभेच्या तोरणावर बसला आणि त्याने तेथे विष्ठा टाकली. ती होती सोन्याची.


सर्वांनीच ती पाहिली. ते सर्वजण आश्चर्यचकित होऊन नवल करू लागले. तेव्हा एकच गडबड होऊन काहीजण पक्ष्याकडे धावले.

पण आता पक्षी सावध होता. तो म्हणाला,

''राजा, याला म्हणतात मूर्खांचा बाजार. जाळ्यात अडकणारा मी एक मूर्ख, मला इथे घेऊन येणारा पारधी शतमूर्ख, हा शहाणा प्रधान सहस्त्रमूर्ख, आणि या सर्व मूर्खांचे ऐकणारा राजा मूर्खशिरोमणी. बरं, नमस्कार महाराज. मी निघतो आता.'' असे म्हणून पक्ष्याने हवेत सूर मारताच सर्व मूर्खांनी आ वासला.

तात्पर्य : ऐकावे जनाचे, करावे मनाचे, सारासार विचारबुद्धी वापरून सारासार विचार करूनच निर्णय घ्यावा.

# जीवन का अमृत (भाग १)



गुरु साहब हमें समझा रहे हैं कि 'नाम' से हम दूर हैं, नाम की कमाई हमने नहीं की, दुनिया की कमाई में ही लगे रहे । आगे फ़रमा रहे हैं कि जो यौवन का समय था, वह हमने गँवा दिया । यौवन के समय की बसंत ऋतु के साथ तुलना की जाती है । जब बसंत ऋतु आती है तो फूल, पत्तियाँ खिलनी शुरू हो जाती हैं । चारों ओर हरियाली छा जाती है । इसी प्रकार जब इंसान यौवन में पहुँचता है, तो उसमें ज़्यादा उमंग, ताकत, खूबसूरती होती है, इसी अहंकार में हम इस सुनहरे समय को गँवा देते हैं । गुरु अर्जनदेव जी हमें समझा रहे हैं : यह जो हमें मानव चोला मिला है, यह आत्मा जो ८४ लाख जियाजून में भटक रही है. उसका यह यौवन का समय है, बसंत ऋतु का समय है । इस समय का हमें पूरा-पूरा फायदा उठाना चाहिए । जब परम संत कृपालसिंह जी महाराज ने मैट्रिक पास की, तो उसके बाद उन्होंने ७ दिन यही सोच विचार किया कि मुझे आगे जिंदगी में क्या करना है ? इस सोच-विचार के बाद वे इस नतीजे पर पहुँचे कि 'God First and World Next,' प्रभु पहले और दुनिया उसके बाद । गुरु अर्जनदेव जी भी हमें समझा रहे हैं कि इस यौवन को हमें गँवाना नहीं चाहिए । अगर इस समय हमारा ध्यान प्रभु की ओर हो गया, तो इसी जिंदगी में हम प्रभु से एकमेक हो सकेंगे । अगर यह समय व्यर्थ हो गया, तो फिर पता नहीं कब यह मौका मिले । जब यौवन का समय होता है, तो जोश होता है । जोश और मस्ती में हर चीज खूबसूरत लगती है । इस जोश से हम पूरा लाभ उठायें, वे हमें यही बता रहे हैं । जैसे कि एक कवि ने कहा है :

### गुरू और परमात्मा

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

इस आख्यान को देखते हुए यह विचार आता है कि आज समाज में जो भी गलत कार्य हमारी आँखों के सामने हो रहे हैं उसे देखते हुए भी हम चुप बैठे रहते हैं। कुछ करना चाहते हैं मगर कर नहीं पा रहे हैं । इसका कारण भी यह है कि हम ऐसे अनाज का सेवन कर रहे हैं जो हमारे अच्छे विचारों को कार्यान्वित होने नहीं दे पा रहा है, इसलिए और ही विकृतियाँ बढ़ रही हैं। इसके फलस्वरूप हम जो चाहते हैं कि हमारा जीवन सुखमय, आनन्दित हो तो उस लक्ष्य तक पहुँचने के लिए इस प्रकार की रुकावट आती है।

अगर हम रासायनिक खाद और कीटनाशक द्वारा होनेवाले नुकसान और कर्मों की गुह्यगति से स्वयं को सुरक्षित रखना चाहते हैं, तो हमें जहाँ से हम ारा मुख्य फाउण्डेशन बिगड़ गया है वहाँसे ही सुधार करना आवश्यक है । और वह मुख्य फाउण्डेशन है हमारे मन के विचार । अब हम नैसर्गिकता से दूर होकर, कृत्रिम जीवन अपना रहे हैं और कुदरती नियमों को तोड़ दिया है, अब फिर से हमें कुदरत के नियम प्रमाण चलकर विज्ञान के आधार से, निसर्ग तथा पाँच तत्वों सहित सर्व जीव-जंतुओं से, वनस्पतियों से, पशु-पंछी, प्राणियों से भी स्नेह और प्रेम का रिश्ता जोड़कर जीवन को सुखमय बनाना है । इसके लिए आवश्यकता है, आध्यात्मिक शक्तियों की जो हमें राजयोग के माध्यम से मिलती हैं । इस 'राजयोग' के माध्यम से मिलनेवाली शक्तियों के आधार से हम जमीन की उर्वरक शक्ति बढ़ा सकते हैं, फसल को निरोगी और शक्तिशाली बना सकते हैं, कई प्रकार के कीट और रोग भी नियंत्रण कर सकते हैं और अनाज में सात्विकता भी ला सकते हैं । ऐसी खेती पद्धति का नाम रखा है शाश्वत यौगिक खेती''।

### आज्ञा चक्र

यह योग कोई अज्ञान, अंधश्रद्धा की बात नहीं है परन्तु यह योग एक सम्पूर्ण विज्ञान है । इस योग में मन्त्र, प्राणायाम या आसनों की बात नहीं है । यह योग अति प्राचीन प्रणाली है । भारत के प्राचीन योग की ख्याति समस्त विश्व तक पहुँची हुई है । फिर भी आज पूरे विश्व में इस योग विद्या की कमी तथा आध्यात्मिक समझ न होने के कारण ही बेचैनी, परेशानी तथा तनाव का प्रकोप बढ़ता जा रहा है । मानवता का भविष्य पूर्णतय: अंध:कार में नज़र आने लगा है । (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

राजू : तुम्ही अंधारात स्वाक्षरी करून शकता?

बाबा : बिल्कुल करू शकतो.

राजू : मग माझ्या रिपोर्ट कार्डवर लवकर करून टाका.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ अमेरिकेचे उपराष्ट्रपती कोण आहेत?

– जे. डी. वॅन्स

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

**आयुर्वेदिक उपचार :** शरीराचे बल वाढविण्यासाठी च्यवनप्राश, शतावरी कल्प असे रसायन उपचार घ्यावेत. या ऋतूत वातसंचय होत असल्याकारणाने पंचकर्म उपचारामध्ये बस्ती उपचार लाभदायक ठरतात. तरी तज्ज्ञ डॉक्टरांकडून आपली प्रकृती परीक्षण करून योग्य ते पंचकर्म ठरवावे.

३) वर्षा ऋतुचर्या आपल्या साहित्य ग्रंथामध्ये वर्षा ऋतू (पावसाळा) बद्दलचे वर्णन अतिशय सुंदर केलेले आहे.

**पर्जन्यवृष्टी भिजवी जनाला ।**
**निवारती घेउनि टोपी तयाला ।।**
**आनंद सर्वा जनतेसी झाला ।**
**वर्षा ऋतू उद्ववी सस्यमाला ।।**

या ऋतूमध्ये खूप जोराने वारे वाहतात. आकाश ढगांनी भरून येते व त्यामुळे पर्जन्यवृष्टी होते. पावसामुळे सर्व जनता भिजते. डोंगर, दऱ्या हिरव्यागार दिसतात. त्यावर विविध जातींची व रंगांची फुले फुलतात. ओढे, नद्या, तलाव पाण्याने भरून वाहतात. सृष्टीचे प्रसन्न व मनमोहक दृश्य दिसते. कारण याच काळात शेतीमध्ये पिकाची लागवड करता येते. पावसापासून संरक्षण होण्यासाठी डोक्यावर टोपी घालावी, असे कवितेमध्ये सांगितले आहे. कारण पावसामध्ये भिजून सर्दी-खोकला, ताप असे विविध साथीचे आजार होतात. म्हणून घराबाहेर पडताना छत्री बाळगावी.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**शरीरदोष अवस्था :** ग्रीष्म ऋतूमध्ये वातसंचय झालेला असतो. या वर्षा ऋतूमध्ये सतत पडणाऱ्या पावसामुळे हवामान आर्द्रतायुक्त व थंड असते. त्यामुळे शीत गुण वाढीला लागून वातप्रकोप होतो व अशक्तपणा आणखीनच वाढतो. या ऋतूत अशक्तपणा, पचनशक्ती कमी जाणवणे ही लक्षणे जास्त प्रमाणात जाणवतात.

**आहार:** सततपावसाळीहवामानामुळेपचनशक्ती कमी झालेली असते. त्यामुळे पचण्यास हलका व योग्य प्रमाणात आहार घ्यावा. अशक्तपणा असल्या मुळे बऱ्याच जणांना वाटते, की शरीराची शक्ती वाढवली जाईल असा आहार घ्यावा. परंतु शक्ती वाढवणारे सर्व पदार्थ पचण्यास जड असतात. या ऋतूत पचनशक्ती कमी असल्याने असे जड पदार्थ खाल्ल्यावर पचनशक्ती अजूनच कमी होऊन विविध आजारांची लागण होते. सुरुवातीला भूक कमी असल्या कारणाने हलका आहार घेऊन पचनशक्ती वाढवावी व काही दिवसांनंतर हळूहळू शरीराला बळ देणारे पदार्थ कमी मात्रेत वापरावेत. आहारामध्ये सुंठ, मिरी, पिंपळी, हिंग, कोथिंबीर, लसूण, आले, जिरे, पुदिना, तुळस, यांसारखे दीपकपाचक पदार्थ जास्त प्रमाणात खावेत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्यावतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्याचे उद्घाटन करताना माजीमंत्री बबनराव घोलप. शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेले चर्मकार बांधव.

# समाजाचा विकास हा एकमेव उद्देश असावा

**बबनराव घोलप यांचे प्रतिपादन; समाज एकतेसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा संवाद मेळावा, शिवाजी साळवे यांची राज्य कार्याध्यक्षपदी नियुक्ती**

नगर – समाजाला जोडून पुढे घेऊन जाणे हीच खरी समाजसेवा आहे. वैचारिक मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने समाजाला पुढे नेणे ही काळाची गरज आहे. समाजाचा विकास हा सर्वांचा एकमेव उद्देश असला पाहिजे आणि त्यासाठी एकच दिशा ठरवून काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजीमंत्री बबनराव घोलप यांनी केले.

नगर शहरात राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात अध्यक्षीय भाषणात घोलप बोलत होते. मेळाव्याप्रसंगी राष्ट्रीय उपाध्यक्ष माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, चर्मोद्योग चर्मकार विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्य अध्यक्ष माधवराव गायकवाड, राज्याचे प्रदेशाध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे, राष्ट्रीय सचिव दत्तात्रेय गोतीसे, राज्य उपाध्यक्ष राजेंद्र बुंदिले, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप कानडे, राज्य सचिव अनिल कानडे, महिला आघाडी राज्य कार्यकारिणी सदस्य शोभाताई कानडे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, माणिकराव नवसुपे, युवक राज्य कार्यकारणी सदस्य कैलासराव गांगर्डे, चंद्रकांत नेटके, विठ्ठलराव जयकर, बाबासाहेब लोहकरे, रोहिदास उदमले, रामकिसन साळवे मेजर, प्रा. संजय कानडे, पोपट बोरुडे आदींसह महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव उपस्थित होते.

पुढे घोलप म्हणाले की, वैचारिक वादाने समाजाचे नुकसान न करता विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे. महासंघाच्या वतीने राज्य सरकारकडे संत रविदास विश्वविद्यापीठ स्थापन करावे, कोरोनामुळे डबघाईला आलेल्या चर्मकार व्यावसायिकांची कर्जमाफी करावी, बार्टी प्रमाणे संत रविदास रिसर्च सेंटर स्थापन व्हावे, अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या धर्तीवर चर्मकार विकास महामंडळाला नियम लागू करावेत आणि संत रविदास महाराज जयंतीला सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली असल्याचे ते म्हणाले. तसेच मंत्रीपदाच्या काळात समाजासाठी स्वतंत्र बजेटची तरतूद केली असून, हा पॅटर्न देशभर राबविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

भाऊसाहेब कांबळे म्हणाले की, सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले शिवाजी साळवे यांच्या माध्यमातून एक जबाबदार कार्यकर्ता महासंघाशी जोडला गेला आहे. त्यांनी ग्रामीण भागात समाज बांधवांना एकत्र आणत अनेक प्रश्न सोडविले आहेत. शेवटच्या घटकांना आधार देऊन पीच परवाने मिळवून दिले, कर्ज प्रकरणे मंजूर होण्यासाठी पाठपुरावा केला. हे सर्व काम गाजावाजा न करता प्रामाणिकपणे केले आहे, त्यामुळे समाजाच्या चळवळीला नवी गती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या मेळाव्यात चर्मकार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी साळवे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रीय चर्मकार महासंघात प्रवेश केला. बबनराव घोलप यांनी साळवे यांची राज्य कार्याध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली. साळवे म्हणाले की, आजपर्यंत मी समाजाच्या तळागाळातील लोकांसाठी संघर्ष करत आलो आहे. शेवटच्या घटकाला न्याय मिळावा, रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, शिक्षणाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचावा यासाठी प्रयत्न राहिला आहे. महासंघात सामील होताना माझ्या खांद्यावर अधिक मोठी जबाबदारी आली आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी निष्ठेने काम केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मेळाव्याच्या प्रारंभी संत रविदास महाराजांना अभिवादन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक राजेंद्र बुंदिले यांनी करुन संघटनेच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. मेळाव्याचे आयोजन जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे व माणिकराव नवसुपे यांनी केले होते. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी एकजुटीने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शारीरीक दृष्टया सक्षम होण्यासाठी एक तरी संस्कृत श्लोक सलग १२ वर्षे म्हणणे आवश्यक

**श्रीमती समिता शिंदे यांचे प्रतिपादन; श्री समर्थ शाळेत संस्कृत दिन उत्साहात साजरा**



श्री समर्थ विदया मंदिर सांगळेगल्ली येथे संस्कृतदिन प्रसंगी रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेज मधील संस्कृत शिक्षिका श्रीमती समिता शिंदे यांचा सन्मान करताना संस्थेचे व्हा. चेअरमन व प्राथमिक विभागाचे शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी. (छाया – उदय जोशी)

नगर – शारीरीक दृष्टया सक्षम होण्यासाठी एक तरी संस्कृत श्लोक सलग १२ वर्षे म्हणणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेज मधील संस्कृत शिक्षिका श्रीमती समिता शिंदे यांनी केले.

श्री समर्थ विद्या मंदिर सांगळेगल्ली येथे संस्कृतदिन उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीमती समिता शिंदे या प्रमुख पाहुण्या होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे व्हा. चेअरमन व प्राथमिक विभागाचे शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी हे होते. सांगळेगल्ली प्राथ विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी आदी उपस्थित होते.

श्रीपाद कुलकर्णी यांनी संस्कृती आणि संस्कृत हे जपणे अत्यंत महत्वाचे आहे. शृंगेरी मधील मत्तूर आणि मध्यप्रदेशातील झील गावात संस्कृत भाषेतूनच अजूनही बोलले जाते असे सांगितले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी यांनी संस्कृत भाषेचे संरक्षण व संवधन करणे आपले काम आहे असे सांगितले.

प्रमुख अतिथी व अध्यक्षीय सूचना सौ. श्रध्दा सुरडकर यांनी केली अनुमोदन रंगनाथ देशमुख यांनी दिले.

पाहुण्याचा परीचय सौ. शारदा होशिंग यांनी करून दिला. विद्यार्थ्यांनी विविध संस्कृत श्लोक व संस्कृत कार्यक्रम सादर केले. कार्यक्रम संस्कृत भाषेतून पार पडला.

सुत्रसंचालन रंगनाथ देशमुख यांनी केले. सौ. योगिता कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप एकात्मता मंत्राने झाला.

# ‘जागेवर निवड संधी’ उपक्रमाचे २० ऑगस्ट रोजी आयोजन

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी ‘जागेवर निवड संधी’ उपक्रमाचे आयोजन २० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्रशासकीय इमारत, पहिला मजला, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष उपस्थित राहावे व रोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

या उपक्रमात सिद्धी फोर्ज आणि सी.एन.सी. प्रा.लि. व फ्लेअर्स एनर्जी एल.एल.पी. एम.आय. डी.सी. अहिल्यानगर या दोन खाजगी आस्थापना सहभागी होणार असून, उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. आयटीआय, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी जागेवरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी जर अद्याप सेवायोजनाची नोंदणी केलेली नसेल, तर त्यांनी www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी. त्यानंतर लॉगिन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज सादर करावा. तसेच, उपक्रमाच्या दिवशी प्रशासकीय इमारतीत प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती द्याव्यात.

उमेदवारांनी www.ncs.gov.in या राष्ट्रीय करिअर सेवा संकेतस्थळावरही सहभाग नोंदवावा व रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी समन्वयक वसीमखान पठाण यांच्याशी ९४०९५५५४६५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# भारताच्या स्वातंत्र्यदिनी साई सूर्य नेत्रसेवेचा अनोखा दृष्टी सोहळा



स्वातंत्र्यदिनी नगरच्या डॉ. कांकरिया परिवाराचा साई सूर्य नेत्रसेवा संस्थेच्या ४० व्या वर्धापना दिवशी अनोखा दृष्टी सोहळा झाला.

नगर – भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिनी नगरच्या डॉ. कांकरिया परिवाराचा साई सूर्य नेत्रसेवा संस्थेच्या ४० व्या वर्धापना दिवशी अनोखा दृष्टी सोहळा झाला. डॉ. प्रकाश कांकरिया यांनी ४० वर्षांचा दृष्टीप्रवास सांगत मानकन्हैय्या नेत्रपेढी, ऑप्टोमेट्रीचे कॉलेज, विविध अत्याधुनिक नेत्रसेवाच्या सुविधा, लेसर किरणांचा यथायोग्य वापर तसेच कॉन्टयुरा लेसर करणांचा चष्मा घालविण्याठी केलेला यथायोग्य वापर याविषयी सविस्तर वैज्ञानिक माहिती सांगितली. व महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट नेत्रपेढी पुरस्कार प्राप्त झाल्योही सांगितले. या निमित्ताने चष्मा नको? हे लेसर किरणांच्या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रसंगी अहिल्यानगर नेत्रतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब बोरूडे, रोटरीचे अध्यक्ष सुभाष गर्जे, सचिव संदीप ठोंबे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

सुरूवातीला डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत करून चष्मा का लागतो? व तो कसा घालवता येतो या विषयी माहिती सांगून तसेच विवाह दृष्टीभेट द्वारे हजारो युवतींच्या जीवनात निर्माण झालेला आनंद व्यक्त केला.

सदर नेत्र शिबीरात संपूर्ण महाराष्ट्रातून व बाहेरहून ही अनेक रूग्णांनी आपण सहभाग नोंदवला व कॉन्टयुरा लेसर नेत्रशस्त्रक्रिया करून निर्दोष दृष्टीचा लाभ घेतला. त्यातील काही जणांना सैन्यात व पोलिसदलात कार्य करण्याचे स्वप्न व काहिंचे विवाहाचे स्वप्न पूर्ण होणार आहे. सदर कार्यक्रमात चाळीस वर्षांच्या प्रवासाचे डॉ. वर्धमान कांकरिया, डॉ. सौ. श्रुतिका कांकरिया, डॉ. अनिल सिंग, डॉ. सौरभ हराळ, डॉ. नलिनी गिते, डॉ. चिन्मयानंद ब्रह्मे सहित अनेक नेत्रतज्ज्ञ सहकारी, रोटरीचे सहकारी, जैन सोशल फेडरेशनचे सहकारी, सामाजीक संस्थेने काम करणारे त्यांचे सर्वांचे विशेष सन्मान करण्यात आले.

मागील वर्षभरात ज्या ज्या लोकांनी मरणोत्तर नेत्रदानाचे पवित्र कार्य केले त्यांच्या कुटुंबियांचा सत्कार करण्यात आले. अतिशय भावनिक अशा कार्यक्रमात सन्मान स्विकारतांना डोळयात अश्रु आले. ह्या सर्व कार्यक्रमात रोटरीचे माजी प्रांतपाल शिरीष रायते, डॉ. रावसाहेब बोरूडे, आनंदऋषीजी नेत्रालयाचे डॉ. महाडीक व अनेकांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला.

डॉ. सौ. सुधा कांकरियांनी लिहिलेल्या ‘दृष्टी’ पुस्तकाच्या २६ व्या आवृत्तीचे प्रकाशनही झाले. तर सर्वांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करून समारोप झाला. ‘दृष्टी सर्वांसाठी’ या पुस्तकात डोळयांची रचना व कार्य लेसर किरण, चष्मा घालविण्याचे आधुनिक तंत्रज्ञान, डायबेटसमुळे डोळयांवर होणारे दुष्परिणाम, मोतिबिंदू, काचबिंदू, तिरळेपणा, कॉन्टयुरा लेसर प्रणाली, नेत्रदान वगैरे बाबतची सखोल शास्त्रशुध्द माहिती असुन डॉ. सुधा कांकरिया यांच्या स्वलिखित कविता ही आहेत.




महावीरनगर जैन स्थानकात त्रीदिवसीय धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

# महावीरनगर जैन स्थानकात त्रीदिवसीय धार्मिक कार्यक्रम उत्साहात

नगर – महावीरनगर सावेडी रोड येथे श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाने (श्री चंदनमलजी सुराणा देहरेकर जैन स्थानक) चातुर्मास काळात तीन दिवसीय कार्यक्रम उत्साहात पार पडले. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ध्वजवंदन करण्यात आले. महासतीजी अमितज्योतीजी म.सा.आदी ठाणा ४ यांच्या सान्निध्यात व गुरू महाराजसाहेबांच्या यांच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम झाला. यात महिला व पुरुष भाविकांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान व्यक्तीमत्वांच्या वेशभूषा परिधान करून स्वातंत्र्यवीरांच्या कार्यास मानवंदना दिली. या नितांत सुंदर कार्यक्रमाची संकल्पना आणि नियोजन सौ. सारिका सचिन कटारिया व सौ. आरती सचिन सुराणा यांनी केले.


१६ ऑगस्ट रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त लहान मुलांनी आकर्षक वेशभूषा परिधान करून नाटिका सादर केली. दही हंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला.

१७ ऑगस्ट रोजी मागील ३२ दिवसापासून सुरु असलेल्या जैन धर्मातील मूळ असलेल्या ३२ आगम ग्रंथाचे वाचन समारोप करण्यात आला. यादिवशी सकाळी ठिक ८.३० वाजता बँड पथक व तुतारीच्या निनादात. डोक्यावर कलश घेऊन मनोज माणकचंद भटेवडा यांच्या निवासस्थानापासून ३२ आगम ग्रंथांची महिलांनी सहजोडा मिरवणूक काढली. वाजतगाजत मिरवणूक महावीरनगर जैन स्थानकात आल्यावर हिरालाल महावीर सुराणा (देहरावाला) परिवारातर्फे सर्व जोडप्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी लहान मोठ्या मुलामुलींनी ३२ आगमांवर आधारित नृत्य नाटिका सादर केली. या कार्यक्रमास नगरसह इंदौर, संगमनेर, अमरावती, पुणे आदी भागातील भाविक उपस्थित होते. सर्व कार्यक्रम सादरीकरण करणाऱ्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमासाठी श्री संघाचे अध्यक्ष अनिल कटारिया व सर्व कार्यकारिणी तसेच आनंद आशिष जाप ग्रुप चे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम समारोपानंतर सर्वांसाठी अतिथी भवन येथे गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.

**कवी ग्रेस यांच्या साहित्यावर आधारित**

# ‘बेसरबिंदी – ग्रेस एक स्मरण’ कार्यक्रमाचे नगर शहरात २३ ऑगस्ट रोजी आयोजन



नगर – मराठी साहित्यातील मानबिंदू असलेले कवी ग्रेस अर्थात माणिक गोडघाटे यांच्या कविता, ललितबंध आणि काही गाणी यांवर आधारित ’बेसरबिंदी– ग्रेस एक स्मरण हा कार्यक्रम केडगाव येथील ऊर्जा भवन येथे २३ ऑगस्ट रोजी सायंकाळ ७ वाजता आयोजित केला असल्याचे सिने अभिनेते आणि अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्ट्स असोसिएशन या संस्थेचे अध्यक्ष डॉ.मिलिंद शिंदे यांनी सांगितले.

त्यांनी पुढे सांगितले की, या कार्यक्रमाची निर्मिती अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनने केली, असून संकल्पना–संहिता लेखन आशिष चासकर यांनी केले आहे. अभिजीत क्षीरसागर यांनी या कार्यक्रमाचे दिग्दर्शन केले असून, सुगंधा कौंडिण्य, आशिष चासकर यांचे निवेदन आणि जान्हवी नाफडे व प्रशांत कुलकर्णी यांचे गायन आहे. प्राची कुलकर्णी–गरूड व अभिजीत क्षीरसागर हे अभिवाचन करणार आहेत. या संहितेला संगीत कामोद खराडे यांनी दिले असून विक्रांत मनवेलीकर यांनी प्रकाश योजना सांभाळली आहे. अमित काळे आणि कुलकर्णी ज्ञानेश यांनी या प्रयोगाचे नेपथ्य केले आहे. नुकताच या कार्यक्रमाचा पहिला प्रयोग पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूट अँड टेलिव्हिजन येथे २ ऑगस्ट रोजी झाला. या कार्यक्रमास पुणेकरांनी प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून काही जागा निमंत्रितांसाठी राखीव आहेत. नगरकरांनी देखील या कार्यक्रमास प्रतिसाद द्यावा, असे आवाहन संस्थेचे संतोष बडे, विवेक घोलप, अमोल दाते, मंगेश देवचक्के, सागर जोशी, दादासाहेब बेरड, गौरव मिरीकर, उपेन्द्र कुलकर्णी, श्रीनाथ केसकर, राधिका कुलकर्णी, योगेश कुलकर्णी यांनी केले आहे.

माहितीसाठी ९८२३३९६६३६ ९४२२२२४८८४, क्रमांकावर संपर्क साधावा.



न्यूरॉन प्री स्कूलमध्ये दहीहंडीच्या सोहळ्यामध्ये राधा–कृष्णाच्या वेषभूषेत सहभागी झालेले शिक्षक व विद्यार्थी.

# न्यूरॉन प्री स्कूलमध्ये रंगला दहीहंडीचा सोहळा

नगर – न्युरॉन प्री स्कूलमध्ये बाळकृष्णाच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी दहिहंडीचा कार्यक्रम साजरा केला. स्कूलमध्ये भारतीय संस्कृती व परंपरेचा योग्य समतोल राखत अनेक सण साजरे केले जातात जेणेकरुन लहान वयातच मुलांवर योग्य संस्कर होतील व ही पिढी संस्कृती व सामाजिक बांधिलकीचे योग्य समीकरण साधतील, अशी आशा शाळेच्या संचालिका व प्राचार्या डॉ. सौ. संगीता मिसाळ यांनी व्यक्त केली. त्यांच्या मते भारतीय संस्कृतीत कला व साहित्याला अतिशय महत्त्व आहे. आपली संस्कृती नृत्य, संगीत, चित्रकला व साहित्य इतर विविध कलागुणांनी समृद्ध आहे व याचे योग्य उदाहरण न्युरॉन प्री स्कूलच्या चिमुकल्यांमध्ये दिसते. शाळेचा अभ्यासक्रम हा अनेक बाबींचे समीकरण साधत आखलेला आहे. जेणेकरुन मुलांच्या मानसिक, शारिरीक व सामाजिक विकास होईल.

स्कूलमध्ये नुकताच जन्माष्टमी साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी कृष्णाची तर विद्यार्थिनींनी राधाची वेशभूषा केली होती तसेच शिक्षकवर्गही राधा आणि कृष्णाच्या वेशभूषेत शाळेत दाखल झाला होता. शिक्षिकांमध्ये को–ऑर्डिनेटर सौ. कविता शिंदे व इतर शिक्षिका सौ. स्वाती डोंगरे, सौ. श्रृती जोशी, नेहा पारिक यांनी बाळकृष्णावर आधारित नाटिका सादर केली व डॉक्युमेंटरी दाखवली तसेच बाळकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन कु. दामिनी मिसाळ व प्राचार्या डॉ. सौ. संगिता मिसाळ यांनी केले. बाळकृष्णाच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी दहिहंडी साजरी केली. विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर नृत्य सादर करत आनंद लुटला. यावेळी सौ. रिया कल्याणी, सौ. सुनिता सुरम, सौ. पायल घोरपडे व सौ. रनिता रच्चा यांनी परिश्रम घेतले.

# मैत्रीतला जीवापलीकडे जपणारा परम आधारवड मित्र : ॲड.अशोक कोठारी



सृजनशील भूमिगत सत्वशील मायबापाच्या पोटी भावनाशील जन्म भेटावा हे तसे परमभाग्य मनस्वी रसिक पिंडअत्यंत हळुवार उत्कट प्रेम करणारा उत्तम प्रशासक, ध्येयवादी कार्यकर्ता, मैत्रीला भावपूर्ण जपणारा मनस्वी मित्र, सर्वसामान्य वरील अन्यायाचे परिमार्जन करणारा अभ्यासू वकील, संस्था हित जपणारा तपस्वी विश्वस्त अशी अनेक भूमिका, माणूस नव्हे तर संस्था म्हणून लौकिकास प्राप्त करून देणारी व्यक्ती म्हणजे ॲडव्होकेट अशोक बन्सीलाल कोठारी. तेच आता ७७ वर्षात पदार्पण करीत आहेत.

सन १९८८ साली ते त्यांचे गुरु हेमराजजी एच. एम. बोरा यांच्या प्रेरणेने अर्बन बँकेचे संचालक झाले, तेही मर्चंट बँकेचे संचालक पद सोडून. कारण त्या काळाच्या नेतृत्वाने त्यांच्यातील सहकार उपासकाची अभ्यासू वृत्ती हेरून या महान संस्थेला वैभव प्राप्त करून देण्याची क्षमता असलेल्या व्यक्तीला संधी दिली आणि त्याचे कृतार्थ सार्थकी समाधान मिळविले. या परमाविश्वासास पात्र राहून नगर अर्बन बँकेला वैभवप्रत नेणारे शिल्पकार भाऊसाहेब बनले. एखाद्या माणसातील गुण हेरून त्याला उच्च पातळीवर नेण्यासाठी मनस्वी धडपड करणारे भाऊसाहेब अनेकांच्या संस्कारित जीवनाचे पाईक बनले. त्यापैकी मी एक – त्यांच्या परीसस्पर्शाने माझ्यासारख्या कष्टकरी विणकर, बीडी कामगाराच्या मुलाला सोनेरी झळाळी मिळाली.

नगर अर्बन बँकेचे पारंपरिक स्वरूप बदलून, बदलत्या अत्याधुनिक काळाची पावले दूरदृष्टीने नव्वदीच्या दशकात ओळखून, बँकेला अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इमारतीचे वैभव प्राप्त करून दिले. म्हणजे त्या काळातील ते पहिले कॉर्पोरेट रूप. गोरगरिबांची ही बँक त्यांनी उच्च शिखरावर नेली नागरी सहकारी बँक्स असोसिएशनला राज्य पातळीवर व स्टेट फेडरेशनला देश पातळीवर लौकिक प्राप्त करून दिला

सहकार बँकिंग क्षेत्रातील अनुभवाची पार्श्वभूमी नसताना अभ्यासपूर्वक कौशल्यातून मिळविलेली प्राविण्यता, उत्तम प्रशासकीय दृष्टी, संस्थेविषयी परमनिष्ठा, आत्मीयता, स्वातंत्र्य चळवळीतील विचारधारेच्या संस्कारांचा वारसा, इतरांचे गुण ओळखून त्यांना कार्यप्रवाहित प्रोत्साहित करणारे मनाचे मोठेपण, सामाजिक बांधिलकी व उत्तम खेळाडूवृत्ती, मैत्रीवर अतूट प्रेम करणारा सामाजिक कार्यकर्ता – अशा गुणसमुच्चयाने त्यांनी मोठा मित्रपरिवार, हितचिंतक परिवार निर्माण केला.आज ते अनेक प्रतिशिष्ठ राजकीय कुटुंबाचे प्रमुख सल्लागार या नात्याने त्या कुटुंबाचे प्रमुख आहेत

तेवढीच अतूट नाती जपणारे पण तोंडावर स्पष्ट, निर्भळ, परखड मत करणारा कडक स्वभाव, अन्याय सहन न करणारा, वेळप्रसंगी समोरच्याशी दोन हात करण्याची तयारी असते मग ती व्यक्ती कितीही बलाढ्य प्रतिष्ठित असो. दिवाणी, फौजदारी, ग्राहक मंच, महसूल, सहकार, विमा, बँकिंग, अपघात प्रकरणे हाताळताना गरीब, कष्टकरी, कामगार, पीडितांना न्याय मिळवून देण्याची त्यांची कार्यपद्धत अनुकरणीय आहे. त्यांच्या न्यायदान प्रक्रियेतून अनेक शिष्य आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण बनले. कोणतीही केस समोर आल्यावर उचित न्यायासाठी त्यातील कायदेशीर बारकावे हेरून, कोर्टात अपेक्षित संकल्पना साध्या–सोप्या भाषेत समजावून सांगायची त्यांची युक्तिवादाची पद्धत आजच्या काळात दुर्मिळ आहे.

जिल्हा न्यायालय न्यायदान व्यवस्थेला २०० वर्षेपूर्ती निमित्त त्यांनी स्वतःची प्रकृती बरी नसताना डॉक्टरांचा विश्रांतीचा सल्ला झुगारून, अत्यंत चिकाटीने कष्टपूर्वक नियोजन, परिश्रमशील पाठपुरावा, सर्वांना बरोबर घेऊन, सर्वांच्या मतांचा आदर करून केलेल्या प्रयत्नांमुळे द्विशताब्दी सोहळा ऐतिहासिक, चिरस्मरणीय व शानदारपणे संपन्न झाला. मा. सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे विद्यमान व निवृत्त न्यायमूर्तीना एकच व्यासपीठावर विराजमान केले यांना भावपूर्ण सन्मानित केले. भारतीय संविधानावर आधारित विद्वत्तापूर्ण व्याख्याने सादर झाली. हे केवळ भाऊसाहेब मधील खेळाडूवृत्ती नेतृत्वातून शक्य झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले ‘न्यायमंदिर’ हा स्मृतिग्रंथ ऐतिहासिक दस्तावेज ठरला.

१९७३ पासून वकिली व्यवसाय करताना त्यांनी ॲडव्होकेट चेंबरची उभारणी करून, ६० चेंबरमधून ३०० वकिलांना, पक्षकारांना सुविधा मिळवून दिल्या न्यायदान प्रक्रियेला गती मिळाली. ही चेंबरची सुविधा मिळण्यासाठी चेंबरच्या सर्व सभासदांना अर्बन बँकेचे चेअरमन असताना कर्ज उपलब्ध करून दिले. लॅपटॉप खरेदीसाठी कर्जसुविधा मिळवून दिली.हजारो लोकांना गृह कर्ज मिळवून देऊन स्वतःचा निवारा उपलब्ध करून दिला आजही ते सर्वजण अर्बन बँकेचे छत्र व कोठारी साहेबांचेपौलिक सहकार्य अशा शब्दात आवर्जून कृतार्थ व्यक्त करतात संघटित सदिच्छेचे किती बळ असते हे कोठारी साहेबांनी सिद्ध करून दाखविले.

सरांनी ज्या–ज्या संस्थेचे नेतृत्व केले त्या संस्थांच्या माध्यमातून अनेकांचे संसार उभे राहिले. त्यांना आधारवडाप्रमाणे जीवनाची दिशा दिली. त्यांची असंख्य उदाहरणे सांगण्यासाठी शब्द अपुरे पडतील. अशा विविध क्षेत्रातील बहुआयाम व्यक्तिमत्वास निरोगी निरामयी उदंड आयुष्य लाभो, हीच प्रार्थना.

**– अशोक कुरापाटी, निवृत्त बँक प्रशासकीय अधिकारी**



महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा झाला. (छाया – लहू दळवी)

# विद्यार्थ्यांनी आईवडिलांची स्वप्न पूर्ण करावे

**चेअरमन विकास गीते यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर महापालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्यावतीने गुणवंत पाल्यांचा व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा**

नगर – महानगरपालिकेतील कर्मचारी नगरकरांना मूलभूत सेवांच्या माध्यमातून आपले कर्तव्य बजावतात. त्यामुळे आपल्या कुटुंबाकडे लक्ष देण्यास त्यांना वेळ मिळत नाही. अशा वेळी त्यांच्या गुणवंत पाल्यांनी जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करावे. आज शिक्षण क्षेत्राबरोबरच क्रीडा व कला क्षेत्रातही करिअर करण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या आई–वडिलांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी धैर्याने पुढे यावे. महापालिका कर्मचारी पतसंस्था नेहमीच सभासदांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. मुलामुलींच्या शिक्षणासाठी तसेच लग्न समारंभासाठी तातडीने कर्जरूपी मदत देऊन संस्था आधारवडाची भूमिका बजावते. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा व कला क्षेत्रात करिअर घडवावे, असे प्रतिपादन पतसंस्थेचे चेअरमन विकास गीते यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा पतसंस्थेचे संचालक सतीश ताठे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमाला विकास गीते, व्हाईस चेअरमन उषाताई वैराळ, महिला बँकेच्या संचालिका शोभना चव्हाण, संचालक बाबासाहेब मुदगल, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक बाळासाहेब पवार, श्रीधर देशपांडे, कैलास चावरे, बाळासाहेब गंगेकर, किशोर कानडे, अजय कांबळे, विजय कोतकर, गुलाब गाडे, बलराज गायकवाड, संचालिका प्रमिला पवार, उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी विक्रम मुटकुळे, सीए उमेश देवकर, पतसंस्थेचे माजी चेअरमन वसंत थोरात, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी सभासद, विद्यार्थी व सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

बाबासाहेब मुदगल यांनी सांगितले की, पतसंस्थेच्या वतीने दरवर्षी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार केला जातो. विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे हे प्रेरणादायी ठरते. त्यातूनच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी उर्जा मिळते. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अनेक वर्षे महापालिकेच्या माध्यमातून कर्तव्य बजावले आहे. सेवानिवृत्ती ही एक नवी जीवनपायरी असते, अशा वेळी आपुलकी, प्रेम व सहभावना दृढ व्हाव्यात यासाठी सत्कार सोहळा महत्त्वाचा ठरतो.

या प्रसंगी उषाताई वैराळ यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी यांनी केले.

# जिल्हा मुख्याध्यापक संघाचे नगरमध्ये २० ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय चर्चासत्र

**जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापकांचा सत्कार**

नगर – अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय चर्चासत्र व जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापकांचा सत्कार येथील अमर ज्योत मंगल कार्यालय, नगर–कल्याण रोड, अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित यांनी केले आहे

चर्चासत्राचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे यांचे हस्ते होणार असून या चर्चासत्रास आमदार संग्राम जगताप, शिक्षण संचालक महेश पालकर, शिक्षण उपसंचालक डॉक्टर गणपतराव मोरे, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाचे अधीक्षक रामदास मस्के आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत

चर्चासत्रामध्ये पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे हे उपस्थित राहून विद्यार्थ्यांची वाहतूक स्कूल बस या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत तसेच या चर्चासत्रामध्ये शालार्थ आयडी, सेवा जेष्ठता, शालेय समित्या, गुणवत्ता वाढ, संच मान्यता, वार्षिक नियोजन आदी विषयावर मार्गदर्शन होणार आहे.

जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या मुख्याध्यापक 'प्राचार्य यांनी कार्यशाळेसाठी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित, सरचिटणीस मिथुन डोंगरे, कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवणे, महानगरचे अध्यक्ष प्राचार्य ज्ञानदेव बेरड, उपाध्यक्ष बाळासाहेब वाघ, आबासाहेब गडदे, बाळासाहेब जंगले, बाळासाहेब वाघ, प्रकाश देशमुख, बालाजी गायकवाड, संघटन मंत्री संजय लहारे, कार्यालय मंत्री मंगेश जाधव, कोषाध्यक्ष एम.बी. राऊत, विद्या सचिव सुनील धुमाळ, श्रीकृष्ण पवार, सौ. संगीता मस्के, संगीता हासे, ज्योस्ना शिंदे, डॉक्टर सुनिता पारे, सुनील सुसरे, गीता तांबे, दशरथ कोपनर, सुनील भोर, शितल बांगर, निवृत्ती इले, अशोक दौंड, भाऊसाहेब रोहकले, उद्धव सोनवणे, एस बी उकिरडे, एस एस पवार, आर. एस औताडे, निरंजन डांगे, शेख जमीर, जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष सचिव तालुका पदाधिकारी आदींनी केले आहे.

# बिडी कामगारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती

नगर – बिडी कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी शिष्यवृत्ती प्रक्रिया सुरु झाली असून मॅट्रीकपूर्वसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ ऑगस्ट तर मॅट्रीकोत्तरसाठी ३१ ऑक्टोबर २०२५ अशी असल्याचे बिडी कामगार दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी कळविले आहे.

# शिक्षक दिनी होणाऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र फंड यांची नियुक्ती



नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त तिसऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र सुंदरदास फंड यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली. स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने हे संमेलन होत आहे.

संमेलनानिमित्त गावातून ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. या दिंडीत साहित्यिक व कवी सहभागी होणार आहेत. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने आयोजन करण्यात आले आहे. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार असून, त्याद्वारे ग्रामीण भागातील काव्यप्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. राजेंद्र सुंदरदास फंड हे साहित्य, सांस्कृतिक मंडळ, महाराष्ट्र परीट धोबी सेवा मंडळाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. साहित्य चळवळीत ते सक्रीय असून, एक उत्तम लेखक आहेत. त्यांनी देडगांवचा बालाजी, चिकूनगुणिया, फायदे एन.आर.एच.एम. चे व ध्यास हागणदारी मुक्तीचा ही पुस्तके लिहिली आहेत. त्यांना राज्य व राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार देखील मिळाले आहेत.



नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयात कृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सवामध्ये सहभागी झालेले शिक्षक व विद्यार्थी.

# महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयात दहीहंडी उत्सव उत्साहात

नगर – येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयात कृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. झेंडूच्या फुलांच्या माळांनी सजवलेल्या आकर्षक दहीहंडीसोबत गोविंदा.....रे... गोपाळा.. च्या तालावर विद्यार्थ्यांनी चांगलाच ठेका धरला होता. गोविंदा..... गोविंदा... च्या आरोळ्यांनी शालेय परिसर गोविंदामय बनला होता. विविध पारंपरिक गोविंदा गीतांसोबत विद्यार्थ्यांनी नृत्याचा मनसोक्त आनंद घेतला.

**विद्यार्थी सुरक्षेला प्राधान्य**

विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेता विद्यार्थ्यांचे एकावर एक थर न लावता रुमालाने डोळे बांधून क्रमाक्रमाने अनेक विद्यार्थ्यांना काठीच्या मदतीने दहीहंडी फोडण्याची संधी देण्यात आली. सुमारे तासभर रंगलेल्या या खेळात कोणत्याही विद्यार्थ्याला दहीहंडी फोडण्यात यश न आल्याने शेवटी राधा कृष्णाच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांकडून दहीहंडी फोडण्यात आली. उत्सवाच्या शेवटी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका मंदा शिंदे आणि विद्यालयातील सर्वांनीच उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# श्री संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त नगरमध्ये २० ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रम

नगर – अखिल नगर शहर सकल नाभिक समाजाच्या वतीने श्री संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा सोहळा २० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता नगरकर पंचाचा वाडा, पानसरे गल्ली, अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडणार आहे.

यानिमित्त सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत श्री संत सेना महाराज अभिषेक व पूजन, भजन व आरती यांचे आयोजन होईल. सकाळी ९ ते १२ या वेळेत पालखी मिरवणूक काढण्यात येणार असून ती पानसरे गल्ली, अर्बन बँक चौक, भिंगारवाला चौक, कापडबाजार, तेलीखुंट, नेता सुभाष चौक, चितळे रोड, या प्रमुख मार्गावरून नगरकरांना संतविचारांचा संदेश देत मार्गक्रमण करेल. व या मिरवणुकीचे ऋग्वेदभवन, बँक ऑफ बडोदा चितळेरोड येथे सांगता होईल.तसेच याच ठिकाणी दुपारी १२ नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्याच्या निमित्ताने शहरातील सर्व समाजबांधवांनी सलून दुकाने बंद ठेवून कार्यक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहिल्यानगर शहर सकल नाभिक समाज व नगरकर पंचाचा वाडा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सॅनिटरी इन्स्पेक्टर डिप्लोमा नगर उपकेंद्राचा ७३ टक्के निकाल

नगर – ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक सेन्टरच्या अहिल्यानगर उप केंद्रामध्ये सॅनिटरी इन्स्पेक्टर डिप्लोमाच्या परीक्षेत विजय शिंदे यांनी ५२० गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. तर निमसे प्रियांका (५०७ गुण) द्वितीय, सोलट गजानन (५०२ गुण) यांनी तृतीय आले.

जून २०२४–२५ बॅच अहिल्यानगर उपकेंद्राचा निकाल ७३ टक्के लागला आहे. या यशाबद्दल संस्थेचे संचालक श्रीकांत कुलांगे, सह शिक्षक डॉ. समीर सय्यद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# स्वच्छता व अन्नसुरक्षा जनजागृती स्पर्धेत अशोकभाऊ फिरोदिया स्कूलचे यश




अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलने उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल विद्यार्थ्यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

नगर – विद्यार्थ्यांमध्ये अन्नसुरक्षा व स्वच्छतेची जागृती निर्माण करण्यासाठी हायजिन फर्स्ट आणि आय लव्ह नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धांमध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्हास्तरीय स्वच्छ परिसर व वैयक्तिक स्वच्छता स्पर्धेत शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला, तर अन्नसुरक्षेवर आधारित आंतरशालेय नाट्यस्पर्धेत शाळेने तृतीय क्रमांक पटकाविला.

स्पर्धेत शाळेने अन्नं पूर्णं ब्रह्मं, ही नाटिका सादर केली. या नाटिकेतून जीवनातील अन्नाचे महत्त्व, अन्नाची स्वच्छता, तसेच समाजातील विविध स्तरावर होणारी अन्नाची नासधूस यावर प्रभावी प्रकाश टाकण्यात आला. नाटकाद्वारे अन्नाची नासाडी थांबवा आणि स्वच्छतेकडे लक्ष द्या! असा जनजागृतीपर संदेश विद्यार्थ्यांनी संदेश दिला. या नाटिकेत साहिला कोकणे, गार्गी पुणतांबेकर, स्वरा बिडवे, रुद्र रसाळ, वर्धिनी गांधी, समृद्धी राऊत, सृष्टी डागवाले, रिधिमा लखारा, काव्या दीक्षित व मनाली देशपांडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या नाटिकेसाठी विद्यार्थ्यांना आसिफ शेख यांनी मार्गदर्शन केले.

स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने आयोजित कार्यक्रमात सर्व विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेला प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात आले, तसेच नाटिका सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. रोहित गांधी व अनुराधा रेखी उपस्थित होते. यावेळी डॉ. गांधी यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना स्वच्छतेचे महत्त्व व हायजिन फूड याबाबत मार्गदर्शन केले. संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी यांनी शाळेला व विद्यार्थ्यांना या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या. शाळेचे प्राचार्य प्रभाकर भाबड, उपप्राचार्या कविता सुरतवाला, प्राथमिक विभाग प्रमुख रेखा शर्मा, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख ज्योती सुद्रिक यांनी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनल शर्मा यांनी केले.

# अहमदनगर सीए शाखा व आयकर विभागातर्फे २२ ऑगस्टला नगरमध्ये टिडीएस तरतुदींवर आधारित जनजागृती कार्यक्रम



प्रसाद पुराणिक

नगर – अहमदनगर सीए शाखा व आयकर आयुक्त (टी. डी. एस.), पुणे यांच्या सयुंक्त विद्यमाने २२ ऑगस्ट रोजी TDS तरतुदींवर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी आयकर आयुक्त कार्यालयातील विविध मान्यवर टी. डी.एस. संदर्भातील सर्व बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत.

सादर कार्यक्रमात आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत कर कपात (TDS) संबधित तरतुदींवर सर्वांगीण माहिती व मार्गदर्शन दिले जाईल. हा कार्यक्रम करदात्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून, TDS परताव्यांविषयीची अचूक माहिती, अंमलबजावणीतील अडचणी, नवीन नियम तसेच तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण या कार्यक्रमात दिले जाणार आहे.

आपल्या संस्थेचे संबंधित कर्मचारी / अधिकारी या कार्यक्रमास उपस्थित राहिल्यास त्यांना TDS रिटर्न्स बाबत अधिक सखोल व अद्ययावत माहिती मिळू शकेल, जे भविष्यातील कामकाजासाठी उपयुक्त ठरेल.

सभासद, संचलक व कर्मचारी यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन सीए शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक व आयकर आयुक्त (टी. डी. एस) पुणे अभिनय कुंभार यांनी केले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खूला असून कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता सीए भवन, नक्षत्र लॉन्स समोर, बुरूडगाव रोड येथे आयोजित केला आहे.



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशताब्दी सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त पेमराज सारडा महाविद्यालयात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# ज्ञानोबा माऊलींच्या गजराने दुमदुमला सारडा महाविद्यालय परिसर

नगर – संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशताब्दी सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त पेमराज सारडा महाविद्यालयात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांच्या संकल्पनेतून आयोजित झालेल्या या पालखी सोहळ्याने सारडा महाविद्यालयातील परिसर ज्ञानोबा माऊलींच्या गजराने दुमदुमन गेला. ज्ञानेश्वर माउलींची मूर्ती सजवलेल्या पालखीत ठेऊन ही पालखी विठ्ठलाच्या व माऊलीच्या जयघोषात लालटाकी परिसरातून काढण्यात आली.

महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात डॉ.माहेश्वरी गावित यांच्या हस्ते ग्रंथ पूजन आणि प्रतिमा पूजन झाले. पर्यवेक्षक प्रा. महेश कुलकर्णी यांनी आपल्या खास शैलीत वारकरी परंपरेला साजेसे भजन सादर केले. तसेच रुद्र कुलकर्णी या विद्यार्थ्याने ज्ञानेश्वर माऊलींच्या अभंगाच्या चालीवर लयबद्ध तबला वादन केले.

पालखीचे महाविद्यालयात आगमन झाल्यावर उत्साहात रिंगण सोहळा रंगला. तसेच महिला प्राध्यापकांमध्ये फुगड्याही रंगल्या. विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी यात सहभाग घेतला.

डॉ.माहेश्वरी गावित यांनी संत ज्ञानेश्वर माउलींच्या महान कार्याची थोडक्यात माहिती देत पसायदानाचा अर्थ विषद केला. या प्रसंगी प्रबंधक अशोक असेरी, उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे, उपप्राचार्य प्रा. गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ. राजू रिक्कल, डॉ. सुजित कुमावत तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

# नेप्तीत मिरवणुकीत चैतन्य कानिफनाथ मूर्तीची स्थापना

**राणा घोड्याच्या नृत्याने ग्रामस्थ मंत्रमुग्ध, धार्मिक उत्साहाचे गावभरात स्वागत**



नगर तालुक्यातील नेप्ती गावात चैतन्य कानिफनाथ मूर्ती स्थापनेनिमित्त मिरवणुक काढण्यात आली. सजवलेल्या रथात कानिफनाथ महाराजांची मूर्ती ठेवण्यात आली यावेळी युवकांनी नाथांची वेशभूषा परिधान करुन ग्रामस्थांचे लक्ष वेधले.

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती गावात १७ ऑगस्ट रोजी चैतन्य कानिफनाथ मूर्ती स्थापनेनिमित्त मिरवणुक काढण्यात आली. सजवलेल्या रथात कानिफनाथ महाराजांची मूर्ती ठेवण्यात आली होती. मिरवणुकीत काही युवकांनी नाथांची वेशभूषा परिधान करुन ग्रामस्थांचे लक्ष वेधले. ओम चैतन्य कानिफनाथ महाराज की जय या जयघोषणेने गाव दुमदुमले.

या मिरवणुकीचे आयोजन नाथयोगी परिवार व नेप्ती ग्रामस्थ यांनी केले होते. नेप्ती बायपास येथून निघालेल्या या मिरवणुकीत ढोल–ताशांचा गजर, डिजेच्या तालावर नृत्य, महिलांनी रांगोळीने सजविलेले मार्ग, चौकाचौकांत ग्रामस्थांचे पुष्पवृष्टीद्वारे स्वागत असे उत्साहपूर्ण दृश्य पाहायला मिळाले. या उत्सवामुळे नेप्ती गाव भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले.

गावातील महिलांनी पारंपरिक पद्धतीने सडा टाकून मिरवणुकीचा मार्ग सजविला होता. अनेकांनी घरासमोर रांगोळ्या काढून मिरवणुकीचे उत्साहात स्वागत केले. मिरवणुकीत कानिफनाथ भक्तांनी घोषणाबाजी करत भक्तिचे दर्शन घडविले. अशोक आंबेडकर (वडगाव गुप्ता) यांच्या राणा घोड्याने गाण्याच्या ठेक्यावर केलेल्या नृत्याने तर संपूर्ण ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले. राणा घोड्याचा नृत्य पाहण्यासाठी महिलांपासून ते लहान मुलांपर्यंत सर्वांनी गर्दी केली होती.

मिरवणुकीची सांगता कानिफनाथ मंदिर येथे झाली. दुसऱ्या दिवशी १८ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजता बजरंग महाराज शेळके नालेगाव, भिमराज कळमकर, नामदेव बेल्हेकर व कानिफ होळकर यांच्या हस्ते कानिफनाथ मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यानिमित्त कानिफनाथ महाराज मंदिराला रंगरंगोटी करून आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तर कानिफनाथ मूर्ती भोवती आकर्षक फुलाची सजावट करण्यात आली होती. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात कानिफनाथ महाराजांची मूर्ती पूर्वाभिमुख विराजमान केलेली आहे. मूर्तीचे निरीक्षण केल्यास कानिफनाथ महाराज आपल्याकडे पाहत असल्याचा भास होतो. दुपारी १ वाजता होम–हवनाचा धार्मिक सोहळा पार पडला.

सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. निजाम भाई शेख यांच्या कलगीतुराच्या कार्यक्रमाने उपस्थितांना आध्यात्मिक ऊर्जेची अनुभूती दिली. सायंकाळी ६ वाजता झालेल्या महाआरतीत हजारो भक्तांनी सहभाग घेतला. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या संपूर्ण सोहळ्याचे आयोजन नाथयोगी परिवार व नेप्ती ग्रामस्थांनी एकत्रित येऊन केले होते. ग्रामस्थांच्या अथक परिश्रमामुळे व सर्वांच्या उत्साही सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. नेप्ती गावातील चैतन्य कानिफनाथ मूर्ती स्थापना सोहळा हा केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविणारा ठरला.

# गरमागरम पोहा भजी

झटपट रेसिपी

मित्रांनो, कांदा, बटाटा, पालकाची भजी आपण नेहमीच खातो. पण काहीतरी वेगळं करायचं असेल तर पोह्यांची भजी करता येईल. अगदी झटपट होणारी सोपी अशी ही रेसिपी आहे. संध्याकाळी चहासोबत ही भजी छान लागतील. हॉस्टेलमधल्या निवांत रविवारी तुम्ही हा प्रकार ट्राय करू शकता.

**सामग्री:** एक कप पोहे, अर्धा चमचा कॉर्न फ्लोर, दोन बारीक चिरलेले कांदे, दोन बटाटे, मीठ, चवीनुसार तिखट, तळण्यासाठी तेल आणि चिरलेली कोथबिर



**कृती:** पोहे एका भांड्यात काढून घ्या. त्यात कांदा, लाल तिखट, कॉर्न फ्लोर, कोथबिर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. बटाटे उकडून घ्या. हे बटाटे नीट कुस्करून घ्या. पोह्यांच्या मिश्रणात घालून मिसळून घ्या. आता या मिश्रणाचे छोटे गोळे तयार करा. कढईत तेल तापवा. हे गोळे अलगदपणे तेलात सोडा. सोनेरी रंगांवर तळून घ्या. पोह्यांची ही चविष्ट भजी सॉससोबत खाता येईल.




## शेर की जुबानी

कर दिया हमनें भी इजहार-ए-मोहब्बत फोन पर...लाख रुपये की बात थी,एक रुपये में हो गई।


जब तू होती थी मेरी जदगी में, तो तेरे मेरे इश्क के चर्चे बहुत थे, अच्छा हुआ की जदगी से चली गई तू, क्योंकि तेरे खर्चे बहुत थे...

हजार जवाबों से अच्छी है खामोशी मेरी, ना जाने कितने सवालों की आबरु रखती है।

# 'एआय' कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची संधी

करीअरवेध

इंटरनेटप्रमाणेच, आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) देखील लवकरच सामान्य माणसाच्या जीवनाचा एक भाग बनणार आहे. 'एआय' कंपन्या यासाठी प्रयत्न करत आहेत. 'एआय' एक चांगली करिअर संधी म्हणून उदयास आली आहे. जगभरातील 'एआय' प्रतिभा आकर्षित करण्यासाठी 'एआय' कंपनीच्या भारतीय 'सीईओं'नी एक शिष्यवृत्ती देऊ केली आहे. त्या अंतर्गत कंपनी इंटर्नशिपसाठी दरमहा दोन लाख रुपये शिष्यवृत्ती देईल. दहावी उत्तीर्ण विद्यार्थीदेखील या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात. 'पुच वन' या कंपनीने 'एआय' प्रतिभा आकर्षित करण्यासाठी इंटर्नशिपची ऑफर दिली आहे. या संदर्भात, कंपनीचे 'सीईओ' समीर भाटिया यांनी 'सोशल मीडिया' साइट एक्सवर पोस्ट केले आहे. त्यांनी स्पष्ट केले आहे, की इंटर्नशिपसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना घरून इंटर्नशिपमध्ये सामील व्हावे लागेल 'पुच वन' हे एक स्टार्टअप आहे. ते सगापूरच्या राष्ट्रीय विद्यापीठातून पदवीधर सिद्धार्थ भाटिया आणि 'आयआयटी' मुंबईमधून पदवीधर अरिजित जैन यांनी सुरु केले आहे. या शिष्यवृत्तीसाठी पदवी अनिवार्य नाही, अर्ज फक्त एक्स वर अर्ज करावा लागेल. ते इंटर्न शोधत आहेत, ज्या अंतर्गत त्यांची कंपनी एक 'एआय' अभियंता आणि एक ग्रोथ मॅजिस्टर शोधत आहे. या पदांवर काम करण्यास इच्छुक असलेले लोक इंटर्नशिपसाठी अर्ज करू शकतात. यासाठी निवडलेल्या उमेदवारांना दरमहा उत्तम रक्कम शिष्यवृत्ती म्हणून दिली जाईल. अर्जात उमेदवारांनी स्पष्ट करावे, की त्यांना या इंटर्नशिप प्रोग्रामसाठी का निवडले जावे.



पोस्टच्या शेवटी लिहिले आहे की ते लवकरच हॅकेथॉनदेखील आयोजित करणार आहेत. हे जकून इंटर्नशिप ऑफर मिळेल. त्यांनी लिहिले आहे की हॅकेथॉनमध्ये टॉप १० मध्ये स्थान मिळवणाऱ्यांना संस्थापकांना भेटण्याची संधी मिळेल.

**शिक्षणसंधी**

**विद्यार्थ्यांची पसंती ब्रिटनला**

अमेरिकेनंतर ब्रिटन ही परदेशी विद्यार्थ्यांची पहिली पसंती बनते आहे. आता येथे प्रवेश घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येत बरीच वाढ झाली आहे. अलिकडच्या काळात अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांची परिस्थिती खूप बदलली आहे. ट्रम्प प्रशासनाच्या कडक धोरणांचा परिणाम असा आहे की आता अमेरिकन विद्यापीठांमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा प्रवेश पूर्वीइतका सोपा राहिलेला नाही. नवीन व्हिसा अपॉइंटमेंट बंद करण्यात आल्या आहेत, विद्यार्थ्यांच्या 'सोशल मीडिया' अकाउंटची बारकाईने तपासणी केली जात आहे. अनेक विद्यार्थ्यांची कायदेशीर स्थितीदेखील तपासण्यात आली आहे, तर अनेक विद्यार्थ्यांना हद्दपार देखील केले जात आहे.

# चार वर्षांमध्ये सहाशे कोटींची कंपनी!

अचिव्हर

एखादी व्यक्ती आपल्या कठोर परिश्रमाने आपले नशीब बदलू शकते. याचे थेट उदाहरण म्हणजे सागर गुप्ता हा तरुण. त्याने फक्त ४ वर्षांत ६०० कोटी रुपयांची कंपनी उभारली. सागरने वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी यशाची एक नवीन कहाणी लिहिली आहे. ज्या वयात बहुतेक तरुण त्यांच्या करिअर निवडण्याबाबत गोंधळलेले असतात, त्या वयात सागर गुप्ताने वयाच्या २२ व्या वर्षी आपली कंपनी सुरू केली. सागर सुरुवातीपासूनच त्याच्या करिअरवर लक्ष केंद्रित करत होता. त्याने यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम केले. सागरसाठी हा प्रवास इतका सोपा नव्हता. त्यासाठी त्याला खूप संघर्ष करावा लागला.

उत्तर प्रदेशातील नोएडा येथील रहिवासी सागर सुरुवातीपासूनच व्यापारी बनू इच्छित होता. बी.कॉम केल्यानंतर अवघ्या एक वर्षात सागरने त्याच्या वडिलांसोबत व्यवसाय सुरू केला. त्याचा व्यवसाय त्याच्या कारकिर्दीत एक मोठा टर्निंग पॉइंट ठरला. अभ्यासानंतर, सागरने उत्पादन व्यवसायात येण्याचा निर्णय घेतला. त्याच्या वडिलांनी एलईडी टेलिव्हिजन उत्पादन युनिट सुरू केले, तेव्हा त्याला त्याच्या मनाप्रमाणे काम करण्याची संधी दिसली.




ज्या वयात मुले त्यांच्या अभ्यासात आणि करिअरमध्ये व्यस्त असतात, त्या वयात सागरने त्याच्या वडिलांचा व्यवसाय पुढे नेण्याचा निर्णय घेतला. सागरला सीए व्हायचे होते; पण त्याच्या नशिबात काहीतरी वेगळेच लिहिले होते. वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी त्याने नोएडा येथे त्याची कंपनी सुरू केली. हे काम इतके सोपे नव्हते; परंतु सागरने त्याच्या वडिलांच्या मदतीने सॅमसंग, तोशिबा आणि सोनी सारख्या ब्रँडेड कंपन्यांसाठी उत्पादन सुरू केले. कालांतराने सागरला त्याच्या कठोर परिश्रमाचे फळ मिळाले आणि त्याची कंपनी अवघ्या चार वर्षांत त्याच्या क्षेत्रात शिखरावर पोहोचली. सागरने त्याच्या वडिलांच्या कंपनीत कठोर परिश्रम केले आणि अवघ्या चार वर्षांमध्ये ६०० कोटी रुपयांचा व्यवसाय बांधला. आजच्या घडीला सागरची कंपनी शंभरहून अधिक कंपन्यांसाठी एलसीडी टीव्ही, एलईडी टीव्ही आणि हाय-एंड टीव्ही बनवते. ही कंपनी दरमहा एक लाखाहून अधिक टीव्ही बनवते. टीव्ही उत्पादन व्यवसायानंतर आता सागरला आता वॉशिंग मशीन, स्पीकर आणि स्मार्ट घड्याळे यांसारखी इलेक्ट्रॉनिक गॅझेट बनवायची आहेत. यासाठी त्याला नोएडामध्ये एक हजार कोटी रुपये गुंतवायचे आहेत. प्रथम त्यांची कंपनी जमीन, उपकरणे आणि सुविधा खरेदी करण्यासाठी चारशे कोटी रुपये गुंतवेल. सध्या त्याचा सोनीपतमध्ये एक कारखाना आहे आणि त्यात एक हजारांहून अधिक कर्मचारी आहेत. कंपनी पुढील तीन वर्षांमध्ये 'आयपीओ' आणण्याच्याही विचारात आहे.

# कौशल्यं डिझायनर्सची

वेगळ्या वाटा

डिझायनगच्या क्षेत्रात कल्पकतेला फार महत्त्व आहे. तुम्ही फॅशन डिझायनर असा क्वा इंटिरिअर डिझायनर क्वा मग ग्राफिक, प्रोडक्ट डिझायनर.. डिझायनग म्हटलं की त्यात वैविध्य असायला हवं. डिझायनगच्या क्षेत्रात करिअर करताना कोणती कौशल्यं असायला हवीत याविषयी...



✻ कल्पकता हा डिझायनगचा गाभा आहे. कल्पकतेच्या बळावरच तुम्ही तुमचे विचार प्रभावीपणे सादर मांडू शकता.

✻ डिझायनर्सनी सतत निरिक्षण करत रहायला हवं. एखादी छोटीशी गोष्टही त्यांना नवी कल्पना देऊ शकते. आसपासचं वातावरण, निसर्ग, पशूपक्षी यांच्याकडून त्यांना बरंच काही शिकता येईल. सतत प्रयोगशील असणंही गरजेचं आहे. नित्यनवं काहीतरी घडवण्यासाठी नव्या गोष्टी आत्मसात करायला हव्यात.

✻ कोणताही डिझायनर प्रत्यक्ष क्वा अप्रत्यक्षपणे ग्राहकांच्या गरजा भागवत असतो. ग्राहकांच्या आवडींनुसार उत्पादनं तयार करतो. त्यामुळे ग्राहकांच्या गरजा ओळखण्याची क्षमता त्यांच्याच असायला हवी.

✻ या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना सतत अपडेट रहायला हवं. लोकांना सतत काहीतरी नवं हवं असतं. ट्रेंड्स, फॅशन सतत बदलत असते. त्यामुळे डिझायनर्सनी सतत अपडेट असायला हवं.

## टेक वॉर्निंग

### 'मोफत वायफाय'चे व्यसन वाईट





फोन सार्वजनिक 'वाय-फाय'शी जोडण्याची सवय अडचणीत आणू शकते. मोफत 'वाय-फाय'चे व्यसन सोयीस्कर वाटू शकते; पण याचा अर्थ असा नाही की ते सुरक्षित आहे. लोक काही चुका करतात ज्यामुळे गोपनीयता आणि सुरक्षितता धोक्यात येऊ शकते. असुरक्षित नेटवर्कमुळे समस्या निर्माण होते. सर्वच मोफत वाय-फाय कायदेशीर नसतात. कारण अनेक वेळा हॅकर्स डिव्हाइसचा ताबा घेण्यासाठी आणि पासवर्ड, ईमेल आणि वैयक्तिक डेटा चोरण्यासाठी मोफत वाय-फाय नेटवर्क वापरू शकतात. डिव्हाइसला नेटवर्कशी जोडण्यापूर्वी नीट विचार करा, अन्यथा ते नुकसान देखील करू शकते.

सार्वजनिक नेटवर्कवर डिव्हाइसचा धोका वाढू शकतो. हॅकर्स डिव्हाइसवर खासगी फाइल्स किंवा धोकादायक मालवेअर ठेवू शकतात. सार्वजनिक वाय-फाय वापरता तेव्हा ही चूक करू नका. व्हीपीएनशिवाय डेटा नेटवर्कवर उघडपणे फिरतो. तो सहजपणे रोखता येतो. ट्रॅफिक एन्क्रिप्ट करण्यासाठी आणि हॅकर्सपासून सुरक्षित ठेवण्यासाठी एचटीटीपीएस साइट्स आणि सुरक्षित व्हीपीएन वापरा. चुकूनही ऑटो-कनेक्टवर वाय-फाय सोडण्याची चूक करू नका.

## ॲप वर्ल्ड

### प्रमोशनल कॉलपासून सुटका हवी, मग हे करा!




प्रमोशनल कॉल्सपासून सुटका मिळवण्यासाठी 'प्ले स्टोअर' किंवा 'ॲप स्टोअर' वरून 'डीएनडी ट्राय' नावाचे ॲप डाउनलोड करावे लागेल. हे एक सरकारी ॲप असून ते 'आयओएस' आणि 'अँड्राईड' दोन्हीसाठी मोफत उपलब्ध आहे.

**ॲप वापरण्याची प्रक्रिया:**

✻ मोबाईल नंबरचा वापर करून 'ओटीपी'च्या मदतीने 'ॲप'मध्ये लॉग इन करा.

✻ लॉग इन झाल्यावर एक डॅशबोर्ड उघडेल. तिथून अनेक गोष्टी करता येतात.

✻ सर्वात आधी, वर दिसणाऱ्या 'चेंज प्रेफरन्स' या पर्यायावर टॅप करा. इथे कोणते कॉल्स यायला हवेत आणि कोणते नकोत हे निवडता येईल.

✻ 'डीएनडी कॅटेगरी'मध्ये अनेक पर्याय मिळतात. तिथे 'फुल्ली ब्लॉक' पासून ते काही विशिष्ट प्रकारचे कॉल्स ब्लॉक करू शकता. यात 'बॅंकिंग/फायनान्शिअल प्रॉडक्टस/विमा/क्रेडिट कार्ड/रिअल इस्टेट, शिक्षण आदींचे काल ब्लॉक करता येऊ शकतात.

## जाणून घ्या

### एसी बंद करण्याचा योग्य मार्ग



पावसाळा सुरू असला तरी उन्हाळा अजून संपलेला नाही. वर्षानुवर्षे एअर कंडिशनर वापरणारे लोकही अनेक वेळा काही चुका करतात. त्यामुळे 'एसी'चा कॉम्प्रेसरच नाही, तर 'एसी'चे भागही लवकर खराब होऊ लागतात. अर्ध्या लोकांना 'एसी' बंद करण्याचा योग्य मार्ग माहित नाही. त्यामुळे एसी वारंवार त्रास देऊ लागतो.

लोक रिमोटने बंद न करता थेट स्विचने 'एसी' बंद करतात. असे करण्याची ही सवय हळूहळू 'एसी'चे आयुष्य कमी करते. त्यासोबतच 'एसी'चे भाग देखील लवकर खराब होऊ लागतील. 'एसी' बंद करण्याचा योग्य मार्ग म्हणजे प्रथम रिमोटने तो बंद करा आणि नंतर स्वीच बंद करा. 'एअर कंडिशनर'चा प्रत्येक भाग महत्त्वाचा असला, तरी कॉम्प्रेसर हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. कारण तो खोलीला थंड करण्यात मोठी भूमिका बजावतो. रिमोटने बंद करण्याऐवजी थेट स्विचने 'एअर कंडिशनर' बंद करता, तेव्हा अचानक वीज खंडित झाल्यामुळे कॉम्प्रेसरवर ताण येतो. वारंवार असे केल्याने, कॉम्प्रेसर लवकर खराब होऊ शकतो. कॉम्प्रेसर हा खूप महागडा भाग आहे. कॉम्प्रेसर खराब झाला, तर तुम्हाला तो दुरुस्त करण्यासाठी किंवा बदलण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागू शकतात. रिमोट वापरण्याऐवजी 'एसी' थेट बंद केल्याने, 'एसी'च्या पंखा आणि मोटर भागांचे आयुष्य कमी होऊ शकते. त्यामुळे ते लवकर खराब होण्याची शक्यता वाढते. ही वाईट सवय बदलली नाही, तर यामुळे एसीचे इलेक्ट्रिकल भागदेखील लवकर खराब होऊ लागतील. असे झाले तर 'एसी' पुन्हा पुन्हा दुरुस्त करण्यासाठी पैसे खर्च करावे लागू शकतात.

# सणासुदीसाठी खास वेश!

स्टाईल स्टेटमेंट



महिलांशी संबंधित ड्रेसग पॅटर्नमध्ये दररोज नवीन बदल आणि प्रयोग दिसून येतात. तसेच, पुरुषांच्या बाबतीत त्यांचा वाढता फॅशन ट्रेंडदेखील गगनाला भिडत आहे. सामान्य आणि औपचारिक पॅंट-शर्ट क्वा जीन्स-टी-शर्ट व्यतिरिक्त, या दिवसांमध्ये सणासुदीच्या काळात कुर्ता पायजामा, जोधपुरी जॅकेट, पठाणी सूट, धोती स्टाईल पायजामा ट्रेंडमध्ये आहेत.

कोल्हापुरी, राजवाडा आणि लोफर्स स्टाईल फुटवेअरचा ट्रेंडदेखील पसंत केला जात आहे. दिवाळीच्या खास प्रसंगी, मुले रॉयल लूकसाठी पारंपारिक लूक स्वीकारू शकतात. यासाठी, तुम्ही कुर्ता क्वा शर्टवर जोधपुरी जॅकेट घालू शकता. या जॅकेटची खास गोष्ट म्हणजे ती चमकदार आणि साधी दोन्ही आहेत. पायजमा व्यतिरिक्त ती जीन्सवरही घालता येतात. राजस्थानी जट्टी या पादत्राणांसह चांगले जुळतात. या आउटफिटसह 'क्लीन-शेव्हन लूक' ठेवण्याचा प्रयत्न करा. मुलांना फिटग आउटफिट्स आवडत नाहीत. अशा परिस्थितीत ते पठाणी सूट निवडू शकतात.

ए लेंथ व्यतिरिक्त, यू लाईन कुर्ते यामध्ये प्रसिद्ध आहेत. या प्रकारच्या सूटमध्ये चेक, प्लेन आणि लाइनग कुर्ते विशेषतः पसंत केले जातात. धोती स्टाईल पॅन्ट कुर्त्यासोबत येतात; परंतु हवे असल्यास, प्लेन पायजामादेखील ट्राय करता येतो. मोजरी हा आउटफिट अधिक खास बनवेल. दिवाळीच्या दिवशी 'फेस्टिव्ह लूक'साठी धोती स्टाईल पायजामा शॉर्ट क्वा लॉन्ग कुर्त्यासोबत पेअर करू शकता. ते जॅकेटसोबतदेखील घालू शकता. फंकी आणि स्टायलिश लूकसाठी, तुम्ही मोजरी क्वा जुतीशिवाय लोफर्सदेखील ट्राय करू शकता.

धोती शेरवानीदेखील आजकाल फॅशनमध्ये हिट आहे. याशिवाय, कुर्त्यासोबत पेअर करून चुरीदार पायजामादेखील घालू शकता. पांढऱ्या रंगाव्यतिरिक्त, ऑफ व्हाईट रंगांना जास्त पसंती दिली जाते. उत्सवाचे खास नारंगी, पिवळे, हिरवे, गुलाबी रंगाचे कुर्ते विशेष पसंत केले जातात. यासह, लेदर फ्लॅट चप्पल, जुट्टी इत्यादींसह साधे फ्लोटर्स घालू शकता.

रॉयल फूटवेअर कॉम्बिनेशन

कोल्हापुरी, राजवाडा आणि लोफर्स स्टाईल फूटवेअर व्यतिरिक्त, मोजडी, जुट्टी, सॅंडल इत्यादींचा ट्रेंडही आजकाल खूप वाढला आहे.



# लाभ मार्शल आर्टचे

फिटनेस फंडा

जिम, एरोबिक्सपेक्षा वेगळ्या व्यायामप्रकाराकडे वळण्याच्या विचारात असाल तर मार्शल आर्टस ट्राय करायला हरकत नाही. कराटे, ज्युदो, तायक्वांदो हे मार्शल आर्टसचे काही प्रकार आहेत. मार्शल आर्टस शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने खूप लाभदायी आहे. याचे फायदे जाणून घेतल्यावर तुम्ही नक्कीच मार्शल आर्टसकडे वळाल.

✻ मार्शल आर्टसमध्ये शरीराची हालचाल खूप वेगात करावी लागते. यामुळे हृदयगती वाढते आणि हृदयाला बळकटी मिळते. हृदयाचं आरोग्य सुधारण्यासाठी मार्शल आर्टस अगदी योग्य आहे.

✻ मार्शल आर्टसमधल्या विविध व्यायामप्रकारांमुळे शरीराची लवचिकता वाढते. शरीर लवचिक झालं की दुखापतींची शक्यताही कमी होते.

✻ मार्शल आर्टस केल्याने तासाभरात साधारण ५०० कॅलरी खर्च होतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी मार्शल आर्टसचा खूप उपयोग होतो.

# अडसर वयातल्या अंतराचा...

मॅच मेकिंग




मी २५ वर्षांची तरुणी आहे आणि पन्नाशीच्या माणसाच्या प्रेमात पडले आहे. एका आदर्श जोडीदाराचे सगळे गुण त्याच्यात आहेत. त्याच्यासोबत असताना मला खूप सुरक्षीत वाटतं. तो मला समजूनही घेतो. पण आमच्या वयातल्या अंतरामुळे मला खूप भीती वाटते. माझं कुटुंब, समाज या नात्याला स्वीकारेल का? दुसरं म्हणजे त्याच्या दातांची रचना मला आवडत नाही. त्याने दातांच्या आरोग्याकडे नेहमीच दुर्लक्ष केलं. मला हे पटत नाही. त्यामुळे हा विषय त्याच्याकडे कसा काढू? हा माणूस मला खूप आवडतो. अशा परिस्थितीत मी काय करू? माझ्या वयाच्या मुलाशी लग्न करू की या माणसाबद्दल घरच्यांशी बोलण्याचं धाडस करू, मी खूपच गोंधळून गेले आहे. मला मार्गदर्शन करा.

**उत्तर :** लग्न ही आयुष्यभराची कमिटमेंट आहे. क्षणिक आकर्षणामुळे एखाद्याची निवड करता येणार नाही. तुमच्या वयात खूप अंतर आहे. त्यामुळे भविष्यात तुमचं नातं किती टिकेल याचा पूर्ण विचार कर. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर माणसाच्या गरजा बदलतात. आज तू तरुण आहेस. पुढच्या दहा वर्षांत हा माणूस साठी ओलांडेल. त्याच्या तब्बेतीच्या तक्रारी निर्माण होतील. तुम्ही विजोडही दिसाल. समाजाचा विरोध होईल. याचा विचार कर.

# चीनने निर्मिला संगणकासारखा मेंदू!

भन्नाट टेक्नॉलॉजी

चीनने तंत्रज्ञानाच्या जगात आणखी एक मोठे पाऊल उचलले आहे. झेजियांग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी मानवी मेंदूप्रमाणे काम करणारा संगणक तयार केला आहे. या अनोख्या संगणकाला 'डार्विन माकड' असे नाव देण्यात आले आहे. त्याची रचना आणि कार्यप्रणाली मानवी मेंदूसारखी आहे.



त्यात २० अब्जाहून अधिक कृत्रिम न्यूरॉन्स वापरले गेले आहेत.

**डार्विन माकड म्हणजे काय?**

डार्विन माकड हा एक न्यूरोमॉर्फिक संगणक आहे. तो झेजियांग विद्यापीठाच्या विकासकांनी विकसित केला आहे. त्याचा उद्देश मानवी मेंदूप्रमाणे विचार करणारा, समजून घेणारा, निर्णय घेणारा संगणक तयार करणे हा होता. हा संगणक ९६० 'डार्विन-३' चिप्सवर आधारित आहे. त्यात शंभर अब्जाहून अधिक सायनॅप्स तयार होतात. सायनॅप्स हे असे भाग आहेत, जे न्यूरॉन्सना जोडतात, त्यामुळे ही प्रणाली माहितीवर खूप वेगाने प्रक्रिया करू शकते.


**डार्विन माकडाची प्रमुख वैशिष्ट्ये**

डार्विन माकड फक्त दोन हजार वॅटच्या विजेवर काम करते. त्यामुळे ते ऊर्जेच्या बाबतीत किफायतशीर बनते. हा संगणक तर्क आणि गणिताच्या जटिल समस्या सोडवू शकतो.

# चला बंगळुरूजवळचे धबधबे बघायला

चला फिरायला

मुंबई, दिल्ली क्वा बंगळुरूसारख्या मोठ्या महानगरांमध्ये आयुष्य नेहमीच धावपळीचे असते. अशा वेळी मन आणि शरीराला थोडा आराम आणि निसर्गाचा स्पर्श हवा असतो. तुम्हाला तसेच काही तरी शोधायचे असेल, तर बंगळुरूच्या आजूबाजूच्या अप्रतिम धबधब्यांना भेट देणे नक्की लाभदायक ठरेल. ही ठिकाणे फक्त सुंदरच नाहीत तर साहस आणि निसर्गप्रेमींसाठी आनंददायकही आहेत.



**चुची फॉल्स**

बंगळुरुपासून केवळ ९० किलोमीटर अंतरावर असलेला हा धबधबा वीकेंडसाठी एकदम योग्य आहे. येथे वाहनांऐवजी धबधब्याचा नाद ऐकायला मिळतो.

**शिवानासमुद्र फॉल्स**

बंगळुरूपासून सुमारे १३५ किलोमीटर अंतरावर असलेला हा धबधबा कावेरी नदीवर असून दोन भागांमध्ये विभागला गेला आहे. गगनचुक्की आणि भरचुक्की हे दोन धबधबे प्रचंड उंचीवरून कोसळतात.

**मुत्याला मडुवु फॉल्स**

हा धबधबा बंगळुरूपासून केवळ ४० किलोमीटर अंतरावर आहे. पाण्याचे थेंब मोत्यासारखे चमकतात, म्हणून त्याला 'पर्ल व्हॅली' असे म्हटले जातं. येथे पक्ष्यांचा किलबिलाट आणि पाण्याचा नाद ऐकताना तुम्ही निसर्गात हरवून जाल.

**बलमुरी आणि एडमुरी फॉल्स**

हे दोन्ही धबधबे बंगळुरूपासून १४० किलोमीटर अंतरावर आहेत. बलमुरी फॉल्स पिकनिकसाठी उत्तम असून 'वॉटर प्ले'चाही आनंद घेता येतो. दुसरीकडे, एडमुरी फॉल्स थोडा शांत, गर्दीपासून दूर असा धबधबा आहे.

**थोट्टिकल्लू फॉल्स (स्वर्णमुखी फॉल्स)**

हा धबधबा बंगळुरूपासून ३३ किलोमीटर अंतरावर आहे. 'स्वर्णमुखी' असे त्याचे दुसरे नाव असून, आजूबाजूचा निसर्ग अत्यंत सुंदर आणि शांततादायक आहे.



पारगाव येथील डॉ. बाळासाहेब शिंदे सामाजिक संस्थेच्या अंतर्गत सौ.वैशाली कोलते स्वयं रोजगार व कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन नेत्रतज्ञ डॉ. नितीन कोलते यांच्या हस्ते करण्यात आले.

# सौ. वैशाली कोलते स्वयंरोजगार व कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

नगर – पारगाव येथील डॉ. बाळासाहेब शिंदे सामाजिक संस्थेच्या अंतर्गत सौ.वैशाली कोलते स्वयं रोजगार व कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन नेत्रतज्ञ डॉ. नितीन कोलते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. शरद कोलते, मनीषा पांडे–कोलते, डॉ. नयना कोलते, विदर्भ मित्र मंडळाचे सर्व सदस्य, केडगाव येथील भजनी मंडळ, मिलिंद कोलते, जयश्री रघुराम, आर्किटेक्ट मीनल काळे विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. कोलते म्हणाले कि पारगाव व परिसरात पूर्वी डॉ. हळबे व डॉ. शरद कोलते यांनी जलसंधारण, वृक्षारोपण, रोजगार अशी कामे केली परंतु आज वेगळ्या समस्या आहेत. मागील नऊ वर्षापासून डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूल च्या माध्यमातून येथे गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचे काम सुरु आहे. परंतु याठीकाणी असणारी सर्व परिस्थिती पाहता अधिक चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी कोलते परिवाराकडून संस्थेला चिंचा फोडण्याचे दोन मशीन उपलब्ध करून देण्यात आले. त्यातून या भागात रोजगार उपलब्ध होऊन त्यातील उत्पन्नातून शाळेचा विकास करता येईल. कोलते परिवार नेहमीच शाळेच्या पाठीशी खंबीर पणे उभा राहील.

या वेळी प्रास्ताविकात प्रा. शिंदे यांनी सौ. वैशाली कोलते यांनी संस्थेला केलेल्या सहकार्याची माहिती दिली. त्याचप्रमाणे या केंद्राच्या माध्यमातून परिसरातील विद्यार्थी, युवक, महिला बचत गट, शेतकरी यांना रोजगार, उद्योग संदर्भातील माहिती व मार्गदर्शन केले जाणार आहे.

यावेळी अवनी फौंडेशनच्या जिल्हा समन्वयक शुभदा ठिगळे यांनी देखील मनोगत व्यक्त करून रोजगार निर्मितीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी निकिता तनपुरे, प्रिती कुमटकर, ईश्वर तनपुरे, सहदेव शिर्के यांनी प्रयत्न केले.

# कचरामुक्त शहरासाठी ‘नैतिक’चा पुढाकार; ‘बायोगॅस निर्मिती’चा केला नवा संकल्प

## स्वच्छ शहर, ऊर्जावान शहर! या ध्येयाकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल : खा. निलेश लंके

नगर – कचरा मुक्त शहर होण्याचा संकल्प घेऊन आणि कचऱ्यापासून बायोगॅस तयार करण्याच्या उद्देशाने नैतिक फाऊंडेशनच्या माध्यमातून स्वच्छता अभियान मोहिमेला नुकतेच प्रारंभ करण्यात आले. फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत अरविंद दरेकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून ही मोहिम राबविण्यात येणार असून, या अभियानाचे उद्घाटन खासदार निलेश लंके यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक योगीराज गाडे, उद्योजक अल्ताफ शेख, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब गुंड, महेश घावटे आदी उपस्थित होते.





कचरा मुक्त शहर होण्याचा संकल्प घेऊन आणि कचऱ्यापासून बायोगॅस तयार करण्याच्या उद्देशाने नैतिक फाऊंडेशनच्या माध्यमातून स्वच्छता अभियान मोहिमेचा फित कापून शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी खासदार निलेश लंके, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे अभिषेक कळमकर, योगीराज गाडे, अलताफ शेख, महेश घावटे, बाळासाहेब गुंड आदी.

फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत दरेकर म्हणाले की, कचरा मुक्त शहर घडविण्यासाठी कचऱ्याचे योग्य संकलन आणि नियोजनबद्ध निचरा होणे आवश्यक आहे. ही जबाबदारी फक्त पालिकेची नसून प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य समजून पुढे यायला हवे. कर्तव्याच्या भावनेतूनच नैतिक फाऊंडेशनने ही मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

घरगुती ओला कचरा वापरून त्यापासून स्वयंपाकासाठी उपयुक्त बायोगॅस तयार करता येऊ शकतो. यामुळे अहिल्यानगरचे भविष्य केवळ स्वच्छच नाही, तर ऊर्जावान व पर्यावरणपूरक होणार आहे. फाऊंडेशनच्या माध्यमातून घराघरातून ओला व सुका कचरा वेगळा करून त्याचे व्यवस्थापन केले जाईल. यामुळे शहरात स्वच्छता तर होईलच, पण नवी ऊर्जा निर्मितीही घडणार असल्याची माहिती दरेकर यांनी दिली.

खासदार निलेश लंके म्हणाले की, कचऱ्यातूनही उर्जेचा स्त्रोत निर्माण होऊ शकतो, ही बाब या प्रकल्पातून सिद्ध होत आहे. कचरा टाकाऊ वस्तू न राहता बायोगॅस निर्मितीचे साधन ठरणार आहे. हा प्रकल्प स्वच्छ शहर, ऊर्जावान शहर या ध्येयाकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. स्वच्छता अभियानाची ही सुरुवात लोकसहभागाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही, यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. या प्रकल्पामुळे घरगुती व औद्योगिक वापरासाठी स्वस्त इंधन उपलब्ध होईल. शेतकऱ्यांना सेंद्रिय खत मिळेल, प्रदूषणात घट होईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शहरात स्वच्छ व निरोगी वातावरण तयार होईल. नैतिक फाऊंडेशनचा हा उपक्रम शहराच्या आरोग्य आणि स्वच्छतेसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नैतिक फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध भागात कचरा गाड्या पाठवून दैनंदिन कचरा वर्गीकृत स्वरूपात संकलित केला जाणार आहे. गोळा केलेल्या ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती केली जाईल तर सुक्या कचऱ्याचे वेगळे व्यवस्थापन होईल. या अभियानात नागरिकांना सक्रियपणे सहभागी करून घेण्यात येणार आहे. प्रत्येक घरातून ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी फाऊंडेशनच्या माध्यमातून कार्य केले जाणार आहे.

# यशवंती महिला मंडळाकडून अनोख्या पद्धतीने स्वातंत्र्य दिन साजरा

## वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश, ग्रामीण रुग्णालयात महिला मंडळ व वैद्यकीय अधिकारी एकत्र

नगर – शहरातील यशवंती मराठा महिला मंडळातर्फे स्वातंत्र्य दिन वृक्षारोपणाने साजरा करण्यात आला. नेवासा येथील ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनाचा सामूहिक संदेश देण्यात आला.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. काटे, डॉ. बागवान, डॉ. घोळवे, डॉ. वाघमोडे, यशवंतीच्या संस्थापिका मायाताई कोल्हे, उपाध्यक्ष कविता दरंदले, माजी शहराध्यक्ष आशाताई शिंदे, विद्या काळे, मिनाक्षी जाधव, प्रतिभा भिसे, सविता बोरुडे, सारीका खांदवे, पूजाताई, सुनिता थोरात, सौ. पाठक, कदम, कावेरी निकम, तसेच रुग्णालयातील आवारे, राठोड, चाकोलकर, राजपूत, गायकवाड, खामकर, सुरडकर, बोपिनवार, अमोल जऱ्हाड आदी उपस्थित होते.

मायाताई कोल्हे म्हणाल्या की, आजचा दिवस हा फक्त झेंडा फडकावून अभिवादन करण्यापुरता न राहता प्रत्यक्ष कृतीतून देशभक्ती दाखविण्याचा असतो. आपण स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करताना भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ व हिरवेगार पर्यावरण देणे ही आपली जबाबदारी आहे. महिला मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. रुग्णालयाच्या आवारात लावलेले हे वृक्ष म्हणजे उद्याच्या समाजाचे प्राणवायू केंद्र आहेत. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याची काळजी घेणे हेच खरे स्वातंत्र्य दिवस साजरा केल्याचे समाधान राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. काटे म्हणाले की, रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना औषधोपचार जितके महत्त्वाचे आहेत तितकेच शुद्ध हवा व स्वच्छ वातावरण महत्त्वाचे आहे. आज महिला मंडळाने घेतलेल्या वृक्षारोपण उपक्रमामुळे रुग्णालय परिसरात हरित वातावरण निर्माण होईल. झाडे लावणे हा एकदाच होणारा उपक्रम नसून त्यांचे संगोपन करणे अधिक महत्त्वाचे आहे. अशा उपक्रमातून समाजाला एक प्रेरणादायी संदेश मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उपस्थितांनी झाडांना पाणी घालून वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.



यशवंती मराठा महिला मंडळातर्फे नेवासा येथील ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात वृक्षारोपण करून स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील तरुणी तरुणींसाठी इस्त्राईल देशात पाच हजार ‘नोकरीच्या संधी’

नगर – जिल्ह्यातील तरुण–तरुणींसाठी इस्त्राईल देशात गृह–आधारित आरोग्य सेवा कर्मचारी म्हणून काम करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे पाच हजार उमेदवारांना ही संधी मिळेल. इच्छुक उमेदवारांनी https://maharashtrainternational.com या वेबसाइटवर जाऊन अर्ज दाखल करावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त रवीकुमार पंतम यांनी केले आहे.

या नोकरीसाठी उमेदवाराकडे संबंधित क्षेत्रात कौशल्य आणि अनुभव असणे महत्त्वाचे आहे. यासाठी भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त आणि किमान ९९० तासांचा अभ्यासक्रम पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवायफरीमधील प्रशिक्षण, नर्सिंग, फिजिओथेरपी, किंवा नर्स असिस्टंटमधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक आहे. जीडीए (GDA), एएनएम (ANM), जीएनएम (GNM), बीएससी नर्सिंग (B.Sc. Nursing), किंवा पोस्ट बीएससी नर्सिंग (Post B.Sc. Nursing) याशिवाय, उमेदवाराला इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवारांचे वय २५ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असावे. या नोकरीसाठी दरमहा १ लाख ६१ हजार रुपयांपर्यंत वेतन मिळू शकते.

### निवड प्रक्रिया आणि सुविधा

इस्त्राईलमध्ये नोकरी मिळवण्यासाठीची निवड प्रक्रिया महाराष्ट्रातच पार पडेल. यासाठी नियुक्ती, आरोग्य तपासणी, व्हिसा आणि पासपोर्टसाठी संपूर्ण मार्गदर्शन आणि मदत दिली जाईल. तसेच, इस्त्राईलमध्ये गेल्यानंतर वैद्यकीय विमा, राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून दिली जाईल. नोकरीच्या सुरुवातीच्या काळात आवश्यक ती सर्व मदत पुरवली जाईल.

या संधीबद्दल अधिक माहिती https://maharashtrainternational.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे, असेही श्री.पंतम यांनी कळविले आहे.

## पं.डॉ. विकास कशाळकरांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित

# शास्त्रीय संगीत मैफिलीला नगरकर रसिकांचा प्रतिसाद

नगर – श्रुती संगीत निकेतन, अहिल्यानगर आणि ओंकार आदिनाद फाऊंडेशन, पुणे या संस्थांच्या वतीने पं. विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे शिष्य, ओंकार देऊळगांवकर, मकरंद खरवंडीकर, पवन नाईक आणि हृषिकेश गांगुर्डे यांच्या शास्त्रीय गायनाची मैफल आयोजित करण्यात आली होती. यात डॉ. कशाळकर सरांच्या स्वरचित बंदिशींचे सादरीकरण करण्यात आले. ही गायन मैफिल विशेष गाजली..



श्रुती संगीत निकेतन, अहिल्यानगर आणि ओंकार आदिनाद फाऊंडेशन, पुणे या संस्थांच्या वतीने पं. विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे शिष्य, ओंकार देऊळगांवकर, मकरंद खरवंडीकर, पवन नाईक आणि हृषिकेश गांगुर्डे यांच्या शास्त्रीय गायनाची मैफल आयोजित करण्यात आली होती.

या मैफलीत मुळात संवादिनी वादक असलेल्या मकरंद खरवंडीकर यांनी कार्यक्रमाची सुरुवात करत राग गावतीमध्ये विलंबित त्रिताला मध्ये खबर न लिनी आणि आये मोरे प्यारे बलमा या बंदिशी सादर केल्या त्यांना संवादिनीवर डॉ.सौ धनश्री खरवंडीकर यांची साथ संगत लाभली. पवन नाईक यांनी राग बिहाग चे सादरीकरण केले, तिलवाडा तालातली तुम बिन चैन आणि द्रुत मधील चैन नहीं आये या बंदिशी गायल्या. ओंकार देऊळगावकर यांनी राग नंद या रागात तिलवाडा तालातली माई री मैं आणि द्रुत तुम्हरे मिलन या बंदिशींचे गायन केले. कार्यक्रमात शेवटी ऋषिकेश गांगुर्डे यांनी जोगमधील सबन के दुख हरन आणि बसंत बहार या जोड रागामधील शुभ घडी शुभ मंगल या बंदिशी घेत घराणेदार मांडणीने मैफिलीवर कळस चढवला. सर्वांना शेखर दरवडे यांनी तबल्यावर आणि मकरंद खरवंडीकर यांनी सर्व संवादिनीची साथ संगत केली.

प्रारंभी ज्ञानेश्वर दुधाडे, रत्नाकर अपस्तंभ, अविनाश देऊळगावकर आणि श्रीकांत नाईक, आदींनी दीपप्रज्वलन करून सर्व कलाकारांचा सत्कार केला. अनिकेत देऊळगांवकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. वेदांत कुलकर्णी, शौनक कुलकर्णी, मुलांशू परदेशी, आनंद चिकटे यांनी तानपुरा आणि स्वर साथ केली. नगरमधील विविध भागातून अनेक मान्यवरांनी आणि संगीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

या कार्यक्रमासाठी डॉ.नीरज करंदीकर, ड.गौरव मिरीकर, श्रीराम तांबोळी, अ‍ॅड. दीपक शर्मा, भूषण भणगे, शोभा ढेपे, डॉ.हेमंत नाईक, डॉ.ऋषिकेश कुलकर्णी उपस्थित होते. श्रुती संगीत निकेतन च्या अध्यक्षा डॉ. सौ. धनश्री खरवंडीकर आणि परिमल कोल्हटकर यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले आणि समन्वयक म्हणून काम पाहिले.



योगी गेंडानाथजी महाराज स्मृत्यर्थ भक्तिगीत गायन स्पर्धा झाल्या. याप्रसंगी श्री विशाल गणेश देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर, खासेराव शितोळे, विश्वस्त चंद्रकांत फुलारी, माणिकराव विधाते, प्रा. तानाजी जाधव, पवन नाईक, राजेंद्र टाक, लक्ष्मणराव डहाळे, सौ. मानसी खिस्ती, श्रीहरी मेंदरकर विजेते स्पर्धक संयोजन समिती सदस्य आणि वादक.

# योगी गेंडानाथजी महाराज भक्तिगीत गायन स्पर्धेतून कलाकार निर्माण होतील

## अ‍ॅड. अभय आगरकर यांचा विश्वास

नगर –गुरू व जीवनाच्या जडणघडणीतील व्यक्तींप्रती कृतज्ञतेचा भाव असेल तर जीवनात यश मिळतेच. या स्पर्धेतून अनेक कलाकार निर्माण झाले आहेत आणि होतील, असा विश्वास श्री विशाल गणेश देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर यांनी व्यक्त केला.

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत योगी गेंडानाथजीमहाराज यांच्या २७व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय भक्तिगीत गायन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अ‍ॅड. आगरकर बोलत होते. स्वरबहार फाऊंडेशनच्या वतीने टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात (गोपाळ काला) या स्पर्धा उत्साहात झाल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत साहित्याचे अभ्यासक माजी प्राचार्य खासेराव शितोळे होते. ते म्हणाले की, योगी गेंडानाथजी महाराजांच्या प्रेरणेतून राजेंद्र टाक घडले. संगीत साधकांसाठी स्पर्धा संयोजनाचे कार्य सुरू केले, ही बाब कौतुकास्पद आहे. अशा स्पर्धांमधील सहभागातून कलाकार घडायला निश्चित मदत होईल, असे ते म्हणाले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण सायंकाळी झाले. यावेळी देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिकराव विधाते म्हणाले की, पालकांनी पाल्यांना त्यांच्या कला प्रांतातील आवडी जोपासण्यासाठी प्रोत्साहित करावे. मसुरीवरून आलेले आकाशवाणी गायक तानाजी जाधव यांनी संगीत साधकांनी उत्तम दर्जाचे संगीत ऐकण्याचा सल्ला दिला. प्रारंभी प्रास्ताविकातून संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र टाक यांनी स्पर्धा आयोजनामागील हेतू विशद केला.

व्यासपीठावर देवस्थानचे विश्वस्त चंद्रकांत फुलारी, सुफी गायक पवन नाईक उपस्थित होते. परीक्षक म्हणून लक्ष्मणराव डहाळे, श्रीहरी मेंदरकर (शिरूर), मानसी खिस्ती यांनी काम पाहिले. अजित गुंदेचा, प्रणव देशपांडे, अच्युत घबाडे यांनी साथसंगत केली. स्पर्धा यशस्वीतेसाठी हर्षद भावे, गणेश धर्माधिकारी, रमेश कार्ले यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांसाठी प्रसाद भोजनाची व्यवस्था होती. सूत्रसंचालन ओंकार टाक यांनी केले. मधुवंती धर्माधिकारी यांनी आभार मानले.

स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे– मोठा गट : श्रृती प्रसाद देशपांडे (प्रथम), अश्विनी प्रशांत जाधव (द्वितीय) व निनाद विनायक पारखी (तृतीय) आणि उत्तेजनार्थ पारितोषिक विकास किसन चव्हाण व पलक निलेश संकलेचा यांना देण्यात आले. लहान गट – आरोही प्रसाद बेडेकर (प्रथम), तन्वी पवन भावसार आणि वेदिका राहुल कुलकर्णी (द्वितीय विभागून), स्वानंदी तुषार देशमुख (तृतीय), उत्तेजनार्थ पारितोषिक स्वरा दादासाहेब फंड आणि रिद्धी राजेश बडगुजर यांना देण्यात आले.

# राज्यातील पशुपालक, शेतकरी व व्यापाऱ्यांवर गोरक्षकांच्या नावाखाली अन्याय व अत्याचार

## कायद्यात तातडीने सुधारणा करावी; जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

नगर – शेतकरी, व्यापारी व कुरेशी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. गोहत्याबंदी कायद्यामुळे पशुपालक, शेतकरी व व्यापाऱ्यांवर गोरक्षकांच्या नावाखाली अन्याय व अत्याचार होत असून या संदर्भात कायद्यात तातडीने सुधारणा करावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.



गोरक्षकांच्या नावाखाली पशुपालक, शेतकरी व व्यापाऱ्यांवर अन्याय व अत्याचार होत असून, कायद्यात तातडीने सुधारणा करावी, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

मोर्चेकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील शेतकरी व पशुपालक आपल्या उपजीविकेसाठी म्हैस, जर्सी, भाकड व दुधाळ जनावरांची खरेदी–विक्री करतात. मात्र काही असामाजिक घटना व तथाकथित गोरक्षक यांच्याकडून शेतकरी व कुरेशी समाजावर अन्याय, मारहाण व दडपशाही केली जाते. जनावरे खरेदी–विक्री करताना खोटे गुन्हे दाखल करून घेण्यास जनावरे जप्त केली जाते व ते गोरक्षणालयांत ठेवून काळाबाजारातून विक्री केली जाते, असा गंभीर आरोप समाजाने केला आहे. गौवंश हत्या बंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत असल्याचेही निवेदनात नमूद आहे. गोठ्यातील उपयुक्त नसलेली जनावरे सांभाळणे शेतकऱ्यांना परवडत नाही, परिणामी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचा इशाराही देण्यात आला. कायद्यात सुधारणा करून देशी गाई व्यतिरिक्त इतर जनावरांना (जर्सी, म्हैस, भाकड) सूट द्यावी, जनावरांची वाहतूक करताना पोलीस संरक्षण द्यावे, बेकायदेशीर जप्ती थांबवावी, खोटे फौजदारी गुन्हे मागे घ्यावेत तसेच अधिकृत कत्तलखान्यांना परवानगी द्यावी, अशा प्रमुख मागण्या समाजाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

